POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२५८ ● मुंबई, रविवार, २० एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

हिंदीला विरोध मग इंग्रजीला का नाही?

सीएम देवेंद्र फडणवीस यांची विचारणा 'महाराष्ट्रात दुसरी...'

■मुंबई। प्रतिनिधी : महाराष्ट्रात आता पहिली ते पाचवीपर्यंत इंग्रजीबरोबर हिंदी भाषाही सक्तीची करण्याच्या शिक्षण विभागाच्या निर्णयाला विरोध होत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निर्णयाला जाहीर विरोध केला असून, विरोधी पक्षाच्या नेत्यांनीही आव्हान दिलं आहे. दरम्यान यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावर प्रतिक्रिया दिली असून, इंग्रजीला पालख्या आणि हिंदीला विरोध हा कोणता विचार आहे अशी विचारणा केली आहे.

राज ठाकरेंविरोधात शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात तक्रार

राज ठाकरेंच्या भूमिकेला वकील गुणरत्न सदावर्ते यांनी विरोध केला असून, शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ''ट्विट करुन राज ठाकरेंनी शाळा, पुस्तकालयं कशी टार्गेट करावी सांगितलं आहे. हे विदारक आहे. एक भाषा अधिक शिकायला मिळत असताना स्वातंत्र्यपूर्व किंवा स्वातंत्र्योत्तर काळात कोणताही राजकारणी कोणीही इतक्या तालिबानी पद्धतीनं वागला नसेल. राज ठाकरेंचं वर्तन दुःखद आहे. राज ठाकरेंना कायदा कळतो की नाही हे उपस्थित करणारं आहे. राज ठाकरेंनी धोरण न वाचता राजकीय पोळी भाजण्यासाठी चालवलेला हा एक प्रयत्न आ-ह'', असाही दावा त्यांनी केला आहे. ''ज्याप्रकारे राज ठाकरे यांचे कार्यकर्ते, बेकायदा मंडळी एकत्रित होऊन सार्वजनिकपणे शिवाजी पार्क पोलीस ठाण्याच्या अख्त्यारित, शासनाच्या निर्णयाचं दहन केलं आहे ते चुकीचं, बेकायदा आणि असंवैधानिक आहे. राज ठाकरेंच्या कार्यकर्त्यांनी कायद्याचा भंग करत बॅनर लावले. भाषेवर आधारित लोकांना वगीर्कृत करणं, वाद निर्माण करणं हेतू आहे. हे जातीय तेढ निर्माण करण्याचंही कृत्य आहे. राज ठाकरेंवर एफआयआर दाखल केला पाहिजे,'' अशी मागणी त्यांनी केली आहे.

> ''महाराष्ट्रात मराठी भाषा अनिवार्य आहे, सर्वांनी ती शिकलीच पाहिजे. पण त्याच्यासोबत दुसरी एखादी भाषा शिकायची असेल तर ती भाषा शिकता येतो. मला तर आश्चर्य वाटतं की हिंदीला विरोध मग इंग्रजीला का नाही. इंग्रजीला पालख्या आणि हिंदीला विरोध हा कोणता विचार आहे,'' असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. यावेळी त्यांनी मराठीला कोणी विरोध केला तर सहन करणार नाही हेदेखील स्पष्ट केलं.

अजित पवारांची भूमिका

''महाराष्ट्रात राहायचं असेल तर मराठी आलंच पाहिजे. भारतातील अनेक राज्यांमध्ये हिंदी भाषा वापरतात. काहीजण हिंदी राष्ट्रभाषा असल्याचं म्हणतात. पण त्यावरुन वाद असून, मला त्या वादात पडायचं नाही. ज्यांना काही उद्योग नाही, काम नाही ते असले वाद घालतात. आणि त्यातच वेळ घालवतात,'' असा टोला अजित पवारांनी राज ठाकरेंना लगावला.

''इंग्रजी ही जगात बहुतेक अनेक देशात चालते. त्यामुळे ती भाषाही आली पाहिजे. तिन्ही भाषेला महत्त्व आहे. पण शेवटी आपली स्वतःच्या मातृभाषेला पहिल्या क्रमांकाचं स्थान आहे,'' असंही त्यांनी स्पष्ट केलं. दरम्यान अजित पवारांच्या या विधानावर मनसेचे शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांनी अजित पवारांना जर हिंदी राष्ट्रभाषा वाटत असेल तर त्यांनी पहिलीपासून धडे घेतले पाहिजेत. त्यांना पुन्हा शाळेत पाठवलं पाहिजे असा टोला लगावला.

विलेपार्लेतील जैन मंदिर पुन्हा बांधणार?

वॉर्ड अधिकाऱ्याच्या त्या आश्वासनानं जैन समाजाचं झालं का समाधान?

■मुंबई। प्रतिनिधी : मुंबईमधील विलेपार्ले परिसरातील कांबळीवाडी येथील 35 वर्ष जुने पार्श्वनाथ जैन मंदिर बुधवारी पाडण्यात आले. मुंबई महापालिकेने ही कारवाई केली. या कारवाईमागील कारणही स्पष्ट झाले. त्यानंतर देशभरातील जैन समुदाय नाराज झाला. मंदिर पाडल्याच्या विरोधात आज, शनिवारी सकाळी निषेध अहिंसक रॅली काढण्यात आली. या रॅलीत मोठ्या संख्येने जैन समाज बांधव, संत आणि राजकीय मंडळी सहभागी झाली होती.

काँग्रेस खासदार आक्रमक

इतके जुने जैन मंदिर पाडण्यावरून काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी सरकारवर निशाणा साधला. ''त्यांची मागणी काय आहे? ज्या अधिकाऱ्याने कारवाई केली, त्या अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी. ही मागणी योग्य आहे. सकाळी दोन जेसीबी आणले, महिलांवर हल्ला झाला. याचा सगळेजण निषेध करतायत. जैन समाज हा शांतताप्रिय समाज आहे. आजपर्यंत त्यांचा कधी आवाज ऐकला होता का? आज का उतरावं लागलं त्यांना?'' असा सवाल वर्षा गायकवाड यांनी विचारला. चुकीच्या पद्धतीने मंदिर पाडण्यात आल आहे. त्यामुळे जैन मंदिर जिथे होत त्याच ठिकाणी बांधून देण्यात यावं. हे हिंदुत्ववादी सरकार आहे ना? मग मंदिर कसे तोडले जात आहेत हा सवाल आहे? तुमची सत्ता सगळीकडे आणि कारवाई मात्र मंदिरावर डबल इंजिनच्या सरकारने ही मंदिरावरील तोडक कारवाई केली आहे, असे त्या म्हणाल्या.

भव्य मंदिर उभारणार

दरम्यान या सर्व घटनेनंतर शिवसेनेचे आमदार मुरजी पटेल यांनी पुढील घडामोडींची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, आज पालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक झाली या बैठकीत ठरलं की,ज्या ठिकाणी मंदिर होत त्या ठिकाणी साफसफाई करण्यात येईल आणि मूतीर्ची स्थापना करून पूजा करण्यात येईल. ज्या हॉटेल मालकीच्या दबावाखाली हे मंदिर तोडण्यात आल आहे त्या हॉटेल मालकच्या अनधिकृत बांधकामाला नोटीस देण्यात येणार आहे. तर यापूर्वी जिथं मंदिर होतं, तिथं पुन्हा त्याच दिमाखात बांधलं जाईल, अशी माहिती आमदार पटेल यांनी वॉर्ड अधिकाऱ्याशी झालेल्या बैठकीनंतर दिली.

सरपंचासह १० जणांकडून महिलेला काठी आणि पाईपने मारहाण, अंगावर दिसेल तिथे जखमा

■बीड। प्रतिनिधी : बीडमध्ये महिलेला निर्दयीपणे मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. काठी आणि रबरी पाईपनं महिलेला बेदम मारण्यात आलं. बीडच्या अंबाजोगाई तालुक्यातील सेनगावात ही धक्कादायक घटना घडली असून सरपंचासह १० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आली आहे. महिलेने फक्त तक्रारी केल्या म्हणून तिला मारहाण करण्यात आली. अमानुष मारहाणीचे छायाचित्र व्हायरल होतात राज्यभरात संताप व्यक्त केला जा आहे.

बीडच्या अंबाजोगाई तालुक्यातील सेनगाव येथील ज्ञानेश्वरी अंजान या महिलेला सरपंच व इतर दहा जणांनी १४ एप्रिल रोजी लाकडी काठी व रबरी पाईपने मारहाण केली या प्रकरणात वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार आहेत. दरम्यान अतिशय अमानुषपणे ही मारहाण करण्यात आली असून फोटो व्हायरल झाले आहेत. यामध्ये महिलेच्या संपूर्ण शरिरावर जखमा दिसत आहेत. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करावी अशी मागणी पुढे येत असून वडगाव पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

'मला जीवे मारलं असतं'

पीडित महिलेने सांगितलं आहे की, ₹मंदिरावरील भोंगे आणि गिरण्यांची मी ज्या आधी तक्रारी दिल्या होत्या, त्यासाठी मला मारहाण करण्यात आली. मला पोलिसांनी सहकार्य केलं. आज मी पोलिसांमुळेच जिवंत आहेत. पोलिसांनी मला खूप सहकार्य केलं. 10 जण मिळून आले होते, त्यातील 9 जणांनी मला बेदम मारहाण केली. एकजण हिला खल्लास करुन टाका, जिवंत सोडू नका असं म्हणत घाणेरड्या शिव्या देत होता. मी बेशुद्ध होईपर्यंत मला मारलं आहे₹. ₹या सर्वांवर मकोका लावावा अशी माझी मागणी आहे. त्यांना जामीन देण्यात येऊ नये. त्यांनी माझा खून करण्याचा प्रयत्न केला,₹ असंही त्यांनी म्हटलं आहे. ₹सरपंच हे पद साधं नसतं. सगळ्यांना घेऊन चालणं अपेक्षित असतं. हा त्या लायकीचा नसल्याने त्याचं सरपंचपद रद्द करावं. मी त्याच्या मुलीच्या वयाची आहे. माज्या घरचं कोणी नसताना, कोणी मदत करु शकणार नाही याची खबरदारी घेऊन त्याने हल्ला केला. माझे हात, डोकं, पाठ सगळीकडे मारहाण केली आहे. त्यामुळे आधी सरपंचपद रद्द करावं. यांना अजिबात जामीन देऊ नये. एकतर संरक्षण द्या किंवा आमचं स्थलांतर करा,₹ अशी मागणीही त्यांनी केली आहे.

पोलिसांनी काय सांगितलं आहे?

१४ एप्रिल रोजी ६ वाजण्याच्या सुमारास ज्ञानेश्वरी श्रीधर अंजन (रा. सानगाव, ता. अंबाजोगाई. जि. बीड) यांना गावातील मंदिरावर लावलेल्या स्पीकर, भोंगे, गावातील पीठाच्या चक्की द्वारे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत बाबत वेगवेगळ्या कार्यालयात दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरून तसंच कोर्टात सुरू असलेल्या खुनाच्या प्रयत्नाची केस काढून घे म्हणत सनगाव गावातील सरपंच व इतर नऊ आरोपींनी त्याना, त्यांचे चुलते श्रीधर अंजन, चुलती अर्चना अंजन याना लाकडी काठ्या व रबरी पाईपने मारहाण केली. तक्रारीच्या आधारे युसूफ वडगाव पोलिस ठाणे गु. र. क्र. ११३/२०२५ कलम ११८(२), ११८(१), ११५(२), ७४, १८९(२), १९०, १९१(२), ३५२, ३५१(२) BNS प्रमाणे गुन्हा नोंद असून सदर गुण्यातील आरोपीचा युसूफ वडगाव पोलिस ठाणे येथील तपास पथक शोध घेत आहे.

बीड जिल्ह्याचा बिहार झालाय का?

बीड जिल्ह्याचा बिहार झालाय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण बीडमधील राजकीय गुन्हेगारी राजकीय लोकप्रतिनिधींपासून थेट सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांपर्यंत झिरपल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातला आरोपी वाल्मिक कराड हा परळीचा नगरसेवक होता. शिवाय आमदार धनंजय मुंडेंचा तो उजवा हात होता. विष्णू चाटे राष्ट्रवादीचा तालुकाध्यक्ष होता. खोक्या भाईसुद्धा आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता आहे. शिवाय भाजपच्या एका सेलचा तो पदाधिकारीही होता. एवढंच नाही तर ज्या संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशी मिळावी यासाठी लढा देणाऱ्या धनंजय देशमुखांचा साडू दादासाहेब खिंडकर यानंही एका तरुणाला अमानूष मारहाण केली. दादासाहेब खिंडकरची दादागिरी कमी की काय आता सेनगावच्या सरपंचाची दादागिरी समोर आली आहे. बीडमधील या राजकीय गुन्हेगारीला आळा घालण्यात पोलिसांनाही यश येताना दिसत नाहीये. बीडमध्ये अनेक गुन्हेगारी टोळ्या अस्तित्वात असल्याचं सांगण्यात येतंय.

मान्सूनबाबत आयएमडीचं मोठं भाकीत

या राज्यांसाठी धोक्याची घंटा

■मुंबई। प्रतिनिधी : भारतीय हवामान विभागकडून २०२५ च्या मान्सून हंगामाबाबत मोठं भाकीत वर्तवण्यात आलं आहे. आयएमडीनं मान्सून संदर्भात दिलासादायक बातमी दिली आहे. भारतीय हवामान विभागाचे प्रमुख डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार यावर्षी देशात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. जूनमध्ये भारतात मान्सूनच आगमन होईल, तर सप्टेंबरमध्ये परतीच्या पावसाला सुरुवात होणार आहे. या काळात देशभरात सरासरी मान्सूनचं प्रमाण १०३ टक्के ते १०५ टक्के राहण्याची शक्यता आहे.

हवामान विभागानं वर्तवलेला हा अंदाज खरा ठरल्यास हा शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. यावर्षी मान्सून वेळेपूर्वीच भारतामध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. सामान्यपणे १५ जूनपर्यंत मान्सून संपूर्ण देश व्यापतो. मात्र यंदा वेळेपूर्वीच देशात मान्सूनचं आगमन होऊ शकतं असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

कोणत्या महिन्यात किती पावसाची शक्यता?

जून महिन्यांमध्ये मान्सून संपूर्ण देश व्यापण्याची शक्यता आहे. जूनमध्ये मान्सूनचं प्रमाण सरासरी १६५.३ मिलीमिटर इतंक राहाण्याचा अंदाज आहे. अर्थात जून महिन्यात सरासरीच्या ९६ टक्के इतका पाऊस होऊ शकतो. जूनमध्ये कोकण, गोवा, आणि समुद्र किनारी भागांमध्ये सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. जुलै महिन्यात पावसाचं प्रमाण वाढणार असून, या महिन्यात सरासरीच्या तुलनेत १०२ टक्के इतका पाऊस पडू शकतो. ऑगस्ट महिन्यामध्ये १०८ टक्के तर सप्टेंबरमध्ये १०४ टक्के इतक्या पावसाचा अंदाज आहे.

मिरखेल गावात ७०० वानरांचा उच्छाद, एका आजोबाला अपंगत्व तर चिमुकलीचा मृत्यू

■भुसावळ। प्रतिनिधी : परभणीच्या मिरखेल गावातील गावकरी चांगलेच धास्तावलेत. घरातून बाहेर पडणंही मुश्किल झालंय आणि याचं कारण आहे, गावात घुसलेली वानरांची टोळी. गावात एक दोन नाही तर तब्बल ७०० पेक्षा अधिक वानरांनी बस्तान मांडलंय. त्यामुळे गावकरी आता चांगलेच त्रस्त झालेत.

रस्त्यावर निवांत बसलेली हि वानरांची टोळी, घर दुकानांवर उड्या मारणाऱ्या वानरांमुळे मिरखेल गावातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालंय. परभणीच्या मिरखेल गावात तब्बल ७०० वानरांनी डेरा जमवलाय.

गावात पाणी आणि झाडं असल्याने वानरं गाव सोडायचं नाव घेत नाहीयेत. कधी हे वानर घरात शिरून भाकरी पळवतात तर कधी गाड्यांवर उडया मारून नुकसान करतायेत, तारांना लोंम्बकाळून तारा तोडतायेत. एवढचं नाही तर शेतीचंही नुकसना करतायेत. केवळ आर्थिक नुकसानचं नाही तर गावातील एका एका चिमुकलीचा वानरांच्या हल्ल्यात मृत्यू झालाय. गावात फिरताना अनेकांचा या वानरांनी चावा घेतलाय. धक्कादायक म्हणजे वानराच्या हल्ल्यामुळे देविदासराव देशमुख या आजोबांना कायमच अपंगत्व आलंय.

तर वानरांमुळे गावातील एक दीड वर्षाच्या मुलीला आपल्या जीवाशी मुकावं लागलंय. आपल्या आजीसोबत जात असताना या मुलीवर वानराने हल्ला केला. यात मुलीच्या मानेची नस दबली आणि उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. मिरखेल गावात गेल्या अनेक वर्षांपासून वानरांनी आपलं बस्तान मांडलंय. गावक-यांनी वनविभागाकडे वारंवार निवेदन देऊनही ढिम्म वनविभाग वानरांचा बंदोबस्त करत नसल्याचा आरोप केला जातोय. वानरांमुळे जिवितहानी झालीये, त्यामुळे आतातरी प्रशासनाने ठोस पाऊल उचलण्याची मागणी होतीये.

मुलींशी अश्लील चाळे, लैंगिक अत्याचाराच्या घटनांनी रागयड हादरलं

रागयड जिल्ह्यात कायदा- सुव्यवस्थेचे तीनतेरा

■रायगड। प्रतिनिधी : रायगडमध्ये मागील काही दिवसांपासून कायदा आणि सुव्यवस्थेवरच प्रश्नचिन्हं उपस्थित करणाऱ्या घटना घडत असल्यानं प्रशासन आणि यंत्रणांच्या चिंतेत भर पडली आहे. रायगड जिल्ह्यात अल्पवयीन मुलींवरील सातत्यानं वाढणाऱ्या अत्याचाराच्या घटना आता चिंतेचा विषय होऊ लागल्या आहेत.

मागील ४ दिवसांत एकट्या रायगड जिल्ह्यातून तीन वेगवेगळ्या घटना समोर आल्या. तळा शहरात बांधकाम सुरू असलेल्या घरात बोलावून एकाने अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे केल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणी गणेश रसाळ याच्याविरोधात तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तर कर्जतमध्ये स्कूल बसचा चालक दोन अल्पवयीन मुलींशी चाळे करीत असल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी करण पाटील याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

दोन दिवसांपूर्वी महाड शहरात देखील असाच प्रकार उघडकीस आला. शिकवणी वरून परतणाऱ्या दोन लहान मुलींना सोसायटीच्या कार्यालयात बोलावून त्यांच्याशी लैंगिक चाळे करणाऱ्या आरोपी विरोधात गुन्हा दाखल झाला. लागोपाठच्या या घटनांमुळे रायगड जिल्ह्यात लहान मुली सुरक्षित आहेत का? असा प्रश्न उपस्थित होताना दिसत आहे.

बस मधील क्लीनरचं अश्लील कृत्य...

रायगड जिल्ह्यातील कर्जत पोलीस ठाणे हद्दीत अवघ्या पाच वर्षाच्या निरागस चिमुकलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. शाळेतील बस मधील क्लीनरनेच हे कृत्य केलं असून, हा बस क्लीनर वदप येथील राहणारा असल्याची माहिती समोर आली. याप्रकरणी ₹पोक्सो₹कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसाने या नराधमाला अटक केली. पीडित मुलीने आपल्या आईला दिलेल्या माहितीमध्ये क्लीनर त्यांना ड्रायव्हरच्या मागच्या सीटवर नेऊन तिच्या शरीराला अश्लील रित्या स्पर्श करत, या विकृत कृत्याने पालकांमध्ये भयानक संताप निर्माण झालाय. या सर्व प्रकाराबद्दल पालकांनी बसचे मालक कमलेश ठाकरे यांना विचारले असता त्यांनी पालकांना उडवाउडविची उत्तरं द्यायला सुरवात केली . बदलापूरमधील घटना ताजी असताना अशाच प्रकारची घटना घडणे हे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित करणारे आहे. दरम्यान कर्जत मध्ये ही अशी विकृती समोर आल्याने पालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. वाईट बाब म्हणजे ही घटना इतकी गंभीर असतानाही देखील हा गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस प्रशासनाला संध्याकाळची रात्र करावी लागली, आलेल्या पालकांना संध्याकाळी सहा ते रात्री अकरा वाजेपर्यंत बसुन ठेवण्यात आले आणि इथंच अनेकांचा संताप झाला. तेव्हा रायगडमध्ये आता राज्य प्रशासनानं जातीनं लक्ष घालण्याची गरज असल्याचं स्पष्ट मत आणि मागणी सामान्य नागरिकांनी करत सुरक्षिततेही हमी मागितली आहे.

ऐकावं ते नवलंच, चक्क पीएसआय निघाला चोर, बसस्थानकात टोळीच्या माध्यमातून करायचा चोऱ्या

■सिंधुदुर्ग। प्रतिनिधी : निवृत्तीला काही महिने बाकी असलेल्या जालन्यातील पोलिस उपनिरीक्षकाला चोरीच्या गुन्ह्यात जळगावात अटक करण्यात आलीये. हा पीएसआय टोळीसह बसस्थानकांत जाऊन सोनसाखळ्यांची चोरी करायचा. चोपडा बसस्थानकात चोरी करून परत जाताना जळगाव पोलिसांनी पाठलाग करत त्याला पकडलंय. तपास केल्यानंतर सोनसाखळी चोरांच्या टोळीचा म्होरक्या पीएसआय असल्याचे समोर आले. जालना येथील उपनिरीक्षक प्रल्हाद मान्टे याच्यासह चार जणांना पोलिसांनी पकडलंय. आरोपींडून एक कारसह रोख रक्कम जप्त केली. याप्रकरणी पीएसआय मान्टेसह, श्रीकांत बघे, अंबादास साळगावकर, पीएसआय शेख यांना पकडलंय. यातील अंबादास साळगावकर या आरोपीवर तब्बल २७ गुन्हे दाखल आहेत.

> चोरांना पकडणारे पोलिसचं चोर निघाले तर...ऐकुन नवल वाटेल पण जळगावच्या चोपडा शहरात, चो-या करणा-या पोलीस उपनिरीक्षकाला बेड्या ठोकण्यात आल्यात. बसस्थानकात आपल्या टोळीसह हा पोलीस चो-या करायचा. हे प्रकरण काय आहे पाहुयात...

अटकेतील पोलिस उपनिरिक्षक प्रल्हाद पिरोजी मान्टे हा राज्यभरातील बसस्थानकावर चोरीचे रॅकेट चालवत असल्याचा पोलिसांना संशय आहे. दरम्यान, सेवानिवृत्तीला अवघे तीन महिने बाकी असताना पोलिसाचा हा कारनामा समोर आल्याने खळबळ उडालीये.

जालन्यातील पोलिस उपनिरिक्षक प्रल्हाद पिरोजी मान्टे याला जळगावातून अटक केल्यानंतर पोलिसदलात खळबळ उडाली. त्यातही बसस्थानकांवरील चोरीच्या घटनांमध्ये त्याचा हातखंडा असल्याने तो अनेक चोरांना प्रशिक्षण देखील देत असल्याची माहितीही पुढे आलीये. चोरांना पकडणारे पोलिसच चोर निघाल्याने सध्या जिल्ह्यात चांगलीच चर्चा रंगलीये.

संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

संशयाच्या भुताला कायमचे गाडा!

तुलसी गबार्ड यांच्या एका वक्तव्याने ईव्हीएम म्हणजेच इलेक्ट्रॉनिक्स व्होटिंग मशीन पुन्हा संशयाच्या काळ्याकुट्ट ढगाखाली आली आहे. नोव्हेंबर २०२४ मधील राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर सत्ताधाऱ्यांनी ईव्हीएममध्ये घोटाळा केल्याचा गंभीर आरोप विरोधकांनी केला होता. महाविकास आघाडीला मे २०२४ मधील लोकसभा निवडणुकीत भरभरून यश मिळाले होते. त्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत नोव्हेंबर २०२४ मधील विधानसभा निवडणुकीत त्याच मतदारांनी महायुतीच्या पारड्यात टाकलेली भरभरून मते, यामुळे हा संशय व्यक्त केला केला. याबाबत आजही विरोधक सत्ताधाऱ्यांना संधी मिळेल तेव्हा लक्ष्य करत आहेत. यापूर्वीही अनेकदा भारतातील ईव्हीएम मतदानावर संशय व्यक्त केला आहे. मात्र, चार-पाच दिवसांपूर्वी तुलसी गबार्ड यांच्या वक्तव्यानंतर पुन्हा ईव्हीएमच्या बाटलीबंद भुताने पुन्हा डोके वर काढले आहे. कारण तुलसी गबार्ड या अमेरिकेच्या नॅशनल इंटेलिजन्सच्या संचालक आहेत. ईव्हीएम हॅक करणे शक्य आहे तसेच निवडणुकीच्या निकालात फेरफार करणे शक्य आहे, असे वक्तव्य त्यांनी केल्यानंतर भारतात त्याचे पडसाद उमटणे साहजिकच आहे. मुख्य म्हणजे त्यांनी हे विधान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत केल्यामुळे याला जास्त महत्त्व आले आहे. त्यातही यापुढील अमेरिकेतील निवडणुका मतदानपत्रिकेवर घ्याव्यात, अशी सूचनावजा मागणी त्यांनी केली आहे. अमेरिकेतील एका बड्या पदावरील व्यक्तीने हे वक्तव्य केल्यामुळे याला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवाय भारतात विरोधकांच्या हातात आयते कोलीत मिळाले. त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आता गप्प का, असा सवाल केला आहे. ईव्हीएम हॅक होऊ शकते, असा दावा भारतात विरोधकांकडून वारंवार केला जात आहे. मात्र, ते त्यांना सिद्ध करता आलेले नाही. मुळात विरोधकांचा ईव्हीएमवर विश्वास नाही. मात्र, लोकसभेतील यश आणि कर्नाटकमधील विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशावर विरोधकांनी ईव्हीएमवर अविश्वास दाखवलेला नाही, हेही लक्षात घ्यावे लागेल. तरीही ईव्हीएमवरील संशय कायम आहे. एक बाब लक्षात घ्यावी लागेल की, हरयाणा विधानसभा निकालावर यंदा फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात असोसिएशन ऑफ डेमॉक्रॅटिक रिफॉर्मच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी करताना न्या. संजीव खन्ना आणि न्या. दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने ईव्हीएममधील डाटा नष्ट करू नका तसेच ईव्हीएममध्ये नवा डाटा अपलोड करू नका, असे निवडणूक आयोगाला बजावले होते. ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर वारंवार प्रश्न विचारले जात असताना सर्वोच्च न्यायालयाने दिलेला वरील आदेश खूप महत्त्वाचा आहे. त्यानंतर दोन महिन्यांत अमेरिकेतून ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यामुळे ईव्हीएमचे भूत पुन्हा भारतीयांच्या मानगुटीवर बसून गोंधळ घालू लागल्याचे दिसू लागले आहे. यापूर्वी जेव्हा जेव्हा ईव्हीएमसंदर्भात काही प्रश्न उपस्थित झाले तेव्हा निवडणूक आयोगाने ईव्हीएममध्ये हेराफेरी होण्याची शक्यता नाकारली होती. एप्रिल २००२ मध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाने ईव्हीएममध्ये हेराफेरी करता येत नाही, असे सर्वोच्च न्यायालयात सांगितले होते. तो दावा मान्य करण्यात आला होता. तर ऑक्टोबर २०१३ मध्ये ईव्हीएमसोबतच व्हीव्हीपॅट सक्तीचे केले होते, जेणेकरून मतदाराने कुणाला मतदान दिले, याची त्याला पोचपावती मिळेल, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते. एवढेच कशाला तर हॅकिंग झाल्याचा आतापर्यंत कोणताही पुरावा नसल्याचे २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तरीही ईव्हीएमवरील विश्वासार्हतेबद्दल वारंवार प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे बाटलीतून वारंवार बाहेर पडणाया भुताला कायमचे गाडणे गरजेचे आहे. वारंवारच्या अविश्वासामुळे निवडणूक प्रक्रियेबद्दल संशय निर्माण होऊ लागला आहे. त्यामुळे संशयकल्लोळाचे हे नाट्य आता थांबलेच पाहिजे. या संशयकल्लोळात अमेरिकेत आणि भारतात वापरली जाणारी ईव्हीएम सारखीच आहे का, हे एकदा स्पष्ट होण्याची गरज आहे. कारण गेल्या वर्षी एलोन मस्क यांनीही ईव्हीएमविरोधात आवाज उठवला होता. मात्र, तेही अमेरिकेबाबत असल्यामुळे दोन्ही देशांमधील ईव्हीएम प्रणालीमध्ये काही फरक आहे का, हे एकदा सर्वांसमोर येणे गरजेचे आहे. तसेच युट्यूबर ईव्हीएम हॅक होऊ शकतात, असे दावे करणारे यापूर्वी व्हिडीओ व्हायरल करण्यात आले होते. यातील सत्यता पडताळून पाहायची असेल तर भारतातील ईव्हीएम हॅक करण्याचे खुले आव्हान केंद्रीय निवडणूक आयोगाने यातील तंत्रज्ञांना, सॉफ्टवेअर एक्स्पर्ट यांना द्यायला हवे. तसे केल्यास तंत्रज्ञ पुढे येऊन ईव्हीएम खरेच हॅक होऊ शकते का, त्यात हेराफेरी करणे शक्य आहे का, हे सांगतील. यातूनच दूध का दूध आणि पानी का पानी होईल. शिवाय या यंत्रणेत काही सुधारणा हव्या असल्यास या तज्ञांकडून जाणून घेता येतील. तसे केल्यास मतदान प्रक्रियेत पारदर्शकता येईल आणि कुणीही अविश्वास व्यक्त करू शकणार नाही. आता ईव्हीएमवरील संशयाचे भूत कायमचे गाडण्याची गरज आहे. हे ओझे दीर्घकाळ मानगुटीवर बसल्यास विक्रम आणि वेताळसारखे होईल. म्हणूनच ईव्हीएमवरील संशय कायमचा नष्ट करण्यासाठी शेवटचे पाऊल उचलण्याची गरज आहे.

भाजपाची सु? शासननीती

पाहुण्याच्या काठीने साप मारण्याची कला शिकायची असेल तर भारतीय जनता पक्षाची शिकवणी अपरिहार्य आहे. आपल्या विरोधकांचा सामना करायचा असेल तर दरवेळेस थेट आपणच त्यांच्यासमोर बाह्या सरसावयला पाहिजेत, असे नाही. अनेकदा 'पाहुण्याची काठी' राजकारणात वरचढ ठरते. यालाच भाजपाची मंडळी 'चाणक्य नीती' असे म्हणतात, हे अधिकच धोकादायक आहे.

पाहुण्याच्या काठीचा वापर करण्यात सर्वात मोठा धुर्तपणा हा की, साप मेला तर उत्तमच. पण तो न मरता नुसती काठीच तुटली तरी दुःख व्हायचे कारण नाही. कारण काठी पाहुण्याचीच तुटली आहे. स्वतःला कोणतीही तोशीस लागू न देता किंवा आपले फारसे नुकसान होऊ न देता, एखादे जोखमीचे काम परस्पर दुसऱ्याकडून करून घेण्याचे हे डावपेच असतात. १३० कोटींच्या देशात, देश चालवण्याची जबाबदारी स्वीकारलेल्या पक्षाने, त्या पक्षाच्या नेत्यांनी असे कारनामे केले तर त्याची दखल घेणे आवश्यक ठरते. ही त्या पक्षाची नियमित प्रवृत्ती बनली वा अशा अनैतिक वागण्यालाच राजकारण वा राजकारणातली 'चाणक्य नीती' असे संबोधले जावू लागले, तर ते त्याहून अधिकच धोकादायक म्हणावे लागेल.

भाजपाला काही आजच संसदेत बहुमत मिळालेले नाही. किंबहुना सध्या तिसऱ्या टर्ममध्ये त्यांना चंद्राबाबू नायडू आणि नितीशकुमार यांच्या पक्षांच्या कुबड्या घेवून राज्यकारभार करावा लागतो आहे. गेले तीन टर्म त्यांचे संसदेतले बहुमत क्रमाक्रमाने कमी होत चाललेले आहे. अशावेळी पहिल्या टर्ममध्ये निर्णायक बहुमत असताना भाजपाने आपली अनेक संवेदनशील धोरणे जाहीरनाम्यापुरतीच झाकून ठेवली. बहुमत असतानाही ती संसदेत मतास टाकली नाहीत वा त्याबाबत काही ठोस निर्णयही घेतले नाहीत. निर्णय करायच्या धोरणाचा साप जेवढा भयानक तेवढा त्याला मारण्यासाठी काठीवाला पाहुणा शोधण्याची गरज अधिक, हा भाजपाच्या धूर्त राजकारणाचा नमूना! यानुसारच, वक्फ संदर्भात सर्वसामान्यांना 'नाउमेद' करणारे विधेयक त्यांनी नेमके मागल्या आठवड्यात संसदेत दाखल केले. संसदेत या विधेयकावरच्या चर्चेत भाग घेणाऱ्या बहुसंख्य विरोधी खासदारांनी म्हटल्याप्रमाणे, हे विधेयक अशा दिवशी आणण्यात आले, ज्या दिवशी भारतातील सत्ताधाऱ्यांच्या गळ्यातील ताईत असलेले अमेरिकेतील सत्ताधारी डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचे (आणि स्वतःच्या देशाचेही) कंबरडे मोडणारा टॅरिफ संदर्भातील निर्णय लागू केला. या निर्णयामुळे त्याच दिवसापासून अमेरिकेतील बाजारपेठेत भारतीय मालावर प्रचंड कर सुरू झाला. यामुळे भारतीय मालाचा तिथला उठाव कमी होणार, भारताची निर्यात कमी होणार, आधीच तीव्र असणारी आपल्याकडील बेरोजगारी अधिक वाढणार. आपल्या संसदेचे अधिवेशन सुरू असताना इतका दूरगामी परिणाम करणारा फटका आपल्याला बसत असेल तर त्यावर संसदेत चर्चा होणे, त्याबाबत आपल्या देशाचे हित सांभाळले जाईल असे पर्याय विचारात घेणे आणि अशा आणीबाणीच्या काळात सत्ताधारी आणि विरोधक यांनी मिळून एकदिलाने, 'देश बचाओ'चा नारा देत, धोरणे ठरविणे आवश्यक आणि शक्य होते. भाजपाची याबाबत, 'इकडे आड आणि तिकडे विहीर' अशी गत झाली आहे. ट्रंप यांच्या टेरीफ धोरणावर टीका करायची तर आपला दोस्त दुखावणार आणि समर्थन करायचे तर देशातील जनतेसमोर आपण उघडे पडणार, अशा पेचात भाजपाचे नेते अडकले. अर्थात, असे उघडे पडण्याची सवय भाजपाला अनावश्यक लॉकडाउन, नोटाबंदी यासारख्या अनेक निर्णयांच्या वेळी झालेली आहे. त्यामुळे त्याच दिवशी जनतेला भ्रमित करणारा, प्रत्यक्षात जनतेच्या पदरात काहीही न पडू देणारा, मात्र भावनात्मक आणि जाती-धर्माच्या राजकारणासाठी सोयीचा वक्फचा मुद्दा ऐरणीवर आणण्यात आला. देशाचे दीर्घकालिक आर्थिक-राजकीय नुकसान करणारे अमेरिकन टेरिफ प्रकरण चक्क कोपऱ्यात ढकलण्यात आले.

वक्फवरील चर्चेत विरोधकांमधील स्वतःला आजही हिंदुत्ववादी म्हणवून घेणारा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष काय भूमिका घेणार याबाबत जेवढे कुतुहल होते, त्याहून अधिक सत्ताधाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसलेले नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू, देवेगौडा यासारखे पूर्वाश्रमीचे धर्मनिरपेक्ष पक्ष काय भूमिका घेतात, हे महत्त्वाचे होते. सत्तेचे बटिक बनलेले हे सगळे संधीसाधू पक्ष गपगुमान आपापल्या काठ्या घेऊन 'भाजपाच्या दृष्टीने साप असलेल्या वक्फला' मारायला बाह्या सरसावून पुढे आले. भाजपाचे पाहुणे भलत्याच इमानाने वागले आणि भाजपासाठीचा साप बिनबोभाट मारला गेला.

संसदेतील सत्ताधाऱ्यांच्या या निषेधार्य आणि घटनाबाह्य बळजबरीचा विरोधकांनी तीव्र शब्दात निषेध केल्यानंतर, भाजपाने आपल्या भात्यातील अजून एक लबाड अस्त्र बाहेर काढले. विरोधकांनी संसदेत अमेरिकेच्या टॅरिफ धोरणावर केलेली चर्चेची मागणी धुडकावण्यासाठी, विरोधकांच्या निषेध टिपणीचा वापर करण्याचे धोरण राबवण्यात आले. सत्ताधारीच संसदेत गोंधळ घालू लागले आणि त्या गोंधळात अधिवेशन संपवून ट्रम्प टॅरिफ धोरणाचा राक्षस विनाचर्चा बाटलीबंद करून टाकण्यात आला.

अशीच क्लुप्ती राष्ट्रीय पातळीवर स्पर्धेत उतरलेल्या राज्यातील सत्ताधारी नेत्यांनी राज्यातील अन्य एका प्रश्नावर चोखाळली आहे. भाजपाच्या सर्व धोरण-व्यवस्थापनात आणि त्याच्या अंमलबजावणीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रशिक्षण कळीचे असल्यामुळे जे दिल्लीत तेच राज्यात! मनसे राजकारणात काय वेगळेपण करून दाखवण्यासाठी स्थापन झालीए, ते त्यांच्या धुरिणांनाच जास्त ठावूक. मात्र राज्यातील सत्तेत भागीदारी करणारी शिंदेसेना असो वा दादांचा राष्ट्रवादी असो, त्यांना कैचीत पकडण्यासाठी फडणविसांनी जे अनेकविध सापळे लावून ठेवले आहेत, त्यात एक प्रभावी काठी मनसेची आहे. कधी दुसऱ्या एखाद्या मुद्द्यावर शिंदेंची, तर कधी दादांची काठीही वापरण्यासाठी सज्ज असतेच. कोणती काठी कधी कोणाच्या टाळक्यात हाणायची आणि कोणता साप मारायचा, याचे डावपेच करणे म्हणजे यांचे राजकारण. आगामी पालिका निवडणुकीत उद्धव ठाकरेंच्या सेनेला शह देण्यासाठी, मराठीच्या मुद्द्यावर आपण आक्रमक झालो तर भाजपाचा राष्ट्रीय पक्षाचा चेहरा आड येतो. मग त्यासाठी मनसेची काठी वापरण्याचा धूर्तपणा राज्य भाजपाने करण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण त्यातून बँकविरोधी आंदोलन उग्र बनते आहे व प्रकरण आपल्याच अंगलट येते आहे, असा फीडबॅक मिळताच, मनसेचा लगाम खेचण्याचे कामही भाजपाला त्वरेने करावे लागले. राजकारणात नगण्य असणाऱ्या मनसेला अशा प्रकारे बढावा देऊन उद्या त्यांनी उद्धव ठाकरेंची मते खाल्ली तर त्यात आपलाच फायदा, हा यातला भाजपाचा धूर्तपणा.

दुतोंडीपणाबाबत भाजपाचे अग्र मानांकन अद्याप कोणाला पटकावता आलेले नाही. कंगणा रानावतबाईंनी स्वातंत्र्याबद्दल व अन्य विषयांवर इतके अकलेचे तारे तोडले की अखेर भाजपाला या आपल्याच खासदारबाईंना गप्प बसवावे लागले होते. अर्थात तरीही फडाणविसांनी त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची काळजी वाहिली होती. मात्र सध्या आपल्याच पक्षात आयात करून मंत्री बनवलेल्या निलेश राणेंच्या संविधान विरोधी वक्तव्यांवर मात्र ते मिठाची गुळणी घेवून बसले आहेत. पुणे इस्पितळ नासधूस प्रकरणी आपल्याच पक्षाचे कार्यकर्ते आणि त्यांना फूस लावणाऱ्या अन्य पक्षातून आयात केलेल्या स्वपक्षीय आमदारबाईंना असेच माफ केले जाणार! कारण, हीच आहे भाजपाची 'सु? शासननीती'.

अपेक्षित पडसाद

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयातशुल्क वाढविण्याच्या निर्णयानंरतचे पडसाद अपेक्षित असेच आहेत. ट्रम्प यांच्या या व्यापारयुद्धाच्या धोरणांना जशास तसे प्रत्युत्तर देण्याच्या चीन, कॅनडा, मेक्सिको या देशांच्या तयारीपासून अमेरिकी उत्पादनांवर बहिष्कार घालण्याचा काही युरोपीय देशांतील मोहिमेपर्यंतच्या घडामोडी हा या पडसादांचाच एक भाग. जगभरातील शेअर बाजारांत होत असलेली पडझडही अगदीच अनपेक्षित नाही. भारतातील शेअर बाजारही त्याला अर्थातच अपवाद नाही. तुलनेने स्थिर मानला गेलेल्या भारतीय बाजारात सोमवारी मोठी घसरण झाली. गेल्या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीनंतर प्रथमच भारतीय निर्देशांकांमध्ये एका दिवसातील सर्वांत मोठी घसरण नोंदविण्यात आली आहे. 'सेन्सेक्स' आणि 'निफ्टी ५०' हे दोन्ही निर्देशांक तीन टक्क्यांहून अधिक प्रमाणात घटले. सत्रांतर्गत व्यवहारांत 'निफ्टी ५०' पाच टक्क्यांनी कोसळला. या तीव्र घसरणीने मागील आर्थिक धक्क्यांची आठवण करून दिली आणि नव्याने मंदीची भीती अधोरेखित झाली. भारतीय बाजारपेठांमध्ये हा 'रक्तपात' होत असतानाच जागतिक बाजारांनाही मोठ्या प्रमाणातील विक्रीला सामोरे जावे लागले. तैवानचा निर्देशांक ९.७ टक्क्यांनी घसरल्याने व्यवहार थांबवावे लागले. जपानचा 'निक्केई २२' हा निर्देशांक ७.४ टक्क्यांनी घसरला. हाँगकाँगचा 'हँगसेंग'ही सर्वाधिक म्हणजे १३ टक्क्यांनी घसरला. या दणक्यातून युरोपीय बाजारही सुटले नाहीत. सत्रांतर्गत व्यवहारांत जर्मनीचा 'डीएएक्स' (६.१ टक्के), फ्रान्सचा 'सीएसी ४०' (६.२ टक्के) आणि ब्रिटनचा 'एफटीएसई १००' (४.८ टक्के) आदी निर्देशांकही घसरले. अमेरिकेतील 'डाउ फ्युचर्स' १२०० अंकांनी (३.३ टक्के), 'एस अँड पी ५००' आणि 'नॅसडॅक फ्युचर्स'ही चार टक्क्यांपर्यंत घसरले. ट्रम्प यांनी सुरू केलेल्या या व्यापारयुद्धात अमेरिकेच्या विरोधात उर्वरित देश असेच लढत राहिल्यास त्याचे फटके सर्वांनाच बसणार यात शंका नाही. मुख्य म्हणजे यामुळे आर्थिक वाढीला रोख बसेल आणि परिणामी महागाईला निमंत्रण मिळेल. 'स्टॅगफ्लेशन' म्हणून ओळखल्या जात असलेल्या परिणामामुळे वस्तूंच्या मागणीत आणि सेवांमध्ये घट होण्याची आणि विविध अर्थव्यवस्थांमधील गुंतवणुकीला धक्का बसण्याची शक्यता आहे. अमेरिकेला पुन्हा महान करण्याच्या आणाभाका घेऊन ट्रम्प यांनी शुल्कवाढीची कुऱ्हाड जगावर चालविली आहे. ते अर्थातच घाईघाईत उचललेले पाऊल नाही. अमेरिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती पाहून 'गोल्डमन सॅक'च्या अर्थतज्ञांनी चौथ्या तिमाहीत तेथील आर्थिक वृद्धीचा अंदाज एक टक्क्यावरून अर्धा टक्क्यावर आणला आहे. किमान १२ महिन्यांच्या मंदीची शक्यताही त्यांनी वर्तविली आहे. वाढीव आयात शुल्कामुळे खुद्द अमेरिकेतील वस्तूंच्या किमती वाढतील, महागाई वाढून तेथील अर्थव्यवस्था मंदावण्याचाही धोका आहे. या प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्याचे आव्हान अमेरिकेसमोर तर आहेच; परंतु जगासमोरही आहे. जागतिकीकरण गतिमान असलेल्या आजच्या काळात अमेरिकेने संकुचित भूमिका घेतली असली, तरी त्याचे परिणाम जगावर होणार आहेत. भारतावरही परिणाम होणार असले, तरी विविध देशांशी व्यापारी संबंध असल्याने या संकटाचा फटका तुलनेने कमी असेल, याकडे जाणकार लक्ष वेधत आहेत. तरीही वस्तूंच्या किमतीतील चढउतार, वाहतुकीतील मालावर होणारा परिणाम आणि प्रत्युत्तर देण्यासाठी राबवलेली व्यापार धोरणे ही मुद्दे येत्या काळात भेडसावणार आहेत.

मुंबई मनपा कर्जात बुडवली जातेय!

भाजपशासित प्रशासकाच्या कारभाराने आपली मुंबई महानगरपालिका कर्जात बुडवली जात आहे! 'इकडे सत्ता-तिकडे सत्ता; कारभार मात्र बेपत्ता' या आवडत्या बिरुदावलीला जगत भाजपने सर्वदूर देशात आणि राज्यात सत्ता मिळवली खरी. पण त्यांच्या सत्ताकाळात बहुतांश महानगरपालिका आणि राज्य अशाच कर्जाच्या खोल गर्तेत जाऊ लागलेत. देशावरील आणि राज्यावरील कर्ज हा एक स्वतंत्र विषय आहे, त्यावर सविस्तर माहिती नंतर येईल. पण आज मुंबई महानगरपालिका कर्जात बुडाल्याची सविस्तर माहिती वाचल्यावर मुंबईकरांचे आणि राजकारण करून मुंबईला प्रशासकाच्या हातात ठेवणाऱ्यांचे डोळे उघडावेत एवढीच अपेक्षा.



मुंबई बनवणारी सात बेटे पूर्वी मराठी भाषा बोलणाऱ्या कोळी लोकांची निवासस्थाने होती. नंतर ती पोतुर्गीज साम्राज्याच्या स्वाधीन झाली. पुढे १६६१मध्ये कॅथरीन ब्रागांझाचा विवाह इंग्लंडच्या चार्ल्स दुसरा सोबत झाला. तेव्हा हुंड्याच्या रूपात ईस्ट इंडिया कंपनीला ही सात बेटे मिळाली. १७८२च्या सुरुवातीस, हॉर्नबी वेलार्ड प्रकल्पाने मुंबईचा आकार बदलला. प्रमुख रस्ते आणि रेल्वेच्या बांधकामाबरोबरच, १८४५ मध्ये पूर्ण झालेल्या पुनर्वसन प्रकल्पाने मुंबईचे अरबी समुद्रावरील प्रमुख बंदरात रूपांतर केले. १८६५मध्ये मुंबई महानगरपालिकेची स्थापना झाली. लोकशाही पद्धतीने महानगरपालिकेची पहिली सभा ४ सप्टेंबर १८७३ रोजी भरली. आर्थर क्रॉफर्ड हे मुंबईचे पहिले महापालिका आयुक्त होते. १८०५पासून पूर्वीच्या मुंबईतील महानगरपालिका प्रशासन अस्तित्वात होते. या काळात नागरी प्रशासन पेटी सेशन्स कोर्टाकडे होते. १८व्या शतकाच्या अखेरीपर्यंत मुंबईचे प्रशासन थेट अध्यक्ष आणि परिषदेकडून चालवले जात होते. तथापि, महानगरपालिका प्रशासन अकार्यक्षम असल्याने, ब्रिटिश प्रशासनाने अनेक प्रयत्न केले. पहिला मोठा बदल १८६५ मध्ये झाला जेव्हा महानगरपालिका बॉडी कॉर्पोरेट म्हणून स्थापन करण्यात आली आणि सर आर्थर क्रॉफर्ड यांची पहिले महानगरपालिका आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर १८७२ मध्ये, १८७२ चा मुंबई कायदा क्रमांक ३ लागू झाल्यानंतर, ६४ निवडून आलेले नगरसेवक असलेले एक नियमित महामंडळ स्थापन करण्यात आले, जे करदाते होते आणि मतदानाचा अधिकार फक्त करदात्यांनाच होता. १८७२ च्या कायद्याच्या मसुद्यात सर फिरोजशाह मेहता यांचा वाटा होता. ज्यामुळे आज दिसणाऱ्या महामंडळाची स्थापना झाली. सर फिरोजशाह १८७३ मध्ये महानगरपालिका आयुक्त म्हणून काम करत होते आणि १८८४-८६ मध्ये अध्यक्ष आणि १९०५ आणि १९११ मध्ये अध्यक्ष म्हणून काम करत होते. मुंबईतील महानगरपालिका सरकारचे जनक म्हणून ओळखले जाणारे सर फिरोजशाह यांचा एक मोठा पुतळा १९२३ मध्ये त्यांच्या स्मृती आणि आदरातिथ्य म्हणून उभारण्यात आला. ब्रिटिश प्रशासनाने १८८८चा मुंबई महानगरपालिका कायदा लागू केला, ज्याने चांगल्या प्रशासनाद्वारे आणि त्यांच्या प्रतिनिधींना योग्य जबाबदाऱ्या देऊन महानगरपालिकेचे कामकाज सुलभ केले. काही सुधारणांसह हा कायदा आजपर्यंत लागू आहे.

शिवसेनाप्रमुखांनी बॉम्बेचे मुंबई केले

२०व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात हे शहर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा एक मजबूत आधार बनले. १९४७मध्ये भारताच्या स्वातंत्र्यानंतर हे शहर बॉम्बे स्टेटमध्ये समाविष्ट करण्यात आले. १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या अनुषंगाने, मुंबई या राजधानीसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात आली. मुंबईचे नाव मुंबादेवी या देवीवरून पडले आहे, असे म्हणतात. पोतुर्गीजांच्या बोम बाहीया या नावाचे इंग्रजांनी बॉम्बे केले. मुंबई, बम्बई आणि बॉम्बे ही तीनही स्त्रीलिंगी नावे एकाच वेळी प्रचलित होती. काहीजण या नगरीला मुंबापुरी म्हणतात. १९९५मध्ये या शहराचे बॉम्बे हे अधिकृत नाव बदलून मुंबई करण्यात आले. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ते केले होते. पूर्वी नगरसेवकाला नगरपिता असे म्हटले जायचे ते नाव बदलून नगरसेवक हे नामकरणही शिवसेनाप्रमुखांनीच केले. मुंबई महानगरपालिकेवर त्यांनी म्हणजे शिवसेनेने जवळपास २५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी सत्ता राखली. मुंबई महानगरपालिका शिवसेनेच्या पारदर्शी भक्कम कारभारामुळे अनेक वर्षे नफ्यात राहिली. एकीकडे उद्धव ठाकरे यांनी मुंबईकरांना सेवा सुविधा, तर दिल्याच. पण त्याचसोबत त्यांनी मुंबई महानगरपालिकेच्या ठेवी देखील वाढवल्या. पुढे याच ठेवीमुळे आणि मुंबई महानगरपालिकेची सत्ता हातात येत नसल्यामुळे राजकारण शिजले आणि ओबीसी आरक्षणच्या याचिकांनी मुंबईची निवडणूक रोखून धरली. गेली पाच वर्षे मुंबई महानगरपालिकेची निवडणूक झालेली नाही आणि मुंबईकरांचे हक्काचे नगरसेवक त्यांना महानगरपालिकेत पाठवता आलेले नाहीत. सरकारने महानगरपालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती दिला आहे. प्रशासक हा केवळ सत्ताधारी व्यक्तीच्या मर्जीनुसार वागतो हे न समजण्याइतके मुंबईकर दुधखुळे नाहीत. प्रशासक आणि सत्तधारी पक्षांनी मुंबई महानगरपालिकेतील उद्धव ठाकरे यांनी मुंबईकरांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ठेवलेल्या ठेवींना नख लावले इतकेच नव्हे, तर त्या ठेवी मोडल्या, तोडल्या आणि त्याचा वापर व्यापारासाठी केला.

आता कर्ज घेण्याशिवाय पर्याय उरलाय कुठे?

अगदी अलीकडेच मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प जाहीर झाला. महापालिकेची निवडणूक न झाल्याने यंदाही प्रशासकांनीच हा अर्थसंकल्प मांडला. हा अर्थसंकल्प तब्बल ७४ हजार ४२७ कोटी रुपयांचा होता. गेल्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत यंदाचा अर्थसंकल्प तब्बल १४.१९ टक्क्यांनी वाढला असला तरी महापालिका दिवाळखोरीत निघाल्याचे स्पष्ट झाले. पालिकेला ठेवी मोडायची वेळ आली. दोन लाख ३२ हजार ४०० कोटी रुपयांच्या वर्क ऑर्डर दिल्याचे या अर्थसंकल्पातून समोर आले; मात्र, त्या देण्यासाठी पैसा शिल्लक नाही. यामुळे आता ठेवी तोडायची वेळ आली आहे. या ठेवी आता ९८ हजार कोटींवरून ९ हजार कोटींचे डिपॉझिट उरणार आहे. समोर एक लाख नव्वद हजार कोटींचे देणे आहे. ही परिस्थिती पाहता मुंबई महापालिकेकडे पुढील चार वर्षांत कर्मचाऱ्यांचा पगार देण्यासही पैसे नसतील, अशी अवस्थाही येऊ शकते. तिजोरीत पैसे नसतानाही महापालिकेने सुमारे दोन लाख ३२ हजार कोटी रुपयांची विकासकामे हाती घेतली. ही कामे पूर्ण करण्यासाठी महापालिकेला कर्ज घ्यावे लागणार आहे अथवा असलेल्या मुदत ठेवीतील पैसे खर्च करणे हा एकमेव पर्याय आहे. मुदत ठेवीतील ८२ हजार कोटीही सध्याच्या विकासकामांसाठी कमी आहेत. त्यामुळे येणाऱ्या चार ते पाच वर्षांत कर्ज घेतल्याशिवाय पालिकेला पर्याय उरणार नाही. मुळात उत्पन्नापेक्षा खर्च का वाढवावा, असा प्रश्न सर्वसामान्य मुंबईकरांना पडला आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात महापालिकेला ४३ हजार ९५९ कोटी ४० लाख रुपये उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे. या उत्पन्नातून कर्मचाऱ्यांचा पगार प्रशासकीय खर्च या उत्पन्नातून ४० टक्के खर्च कर्मचाऱ्यांचे पगार व अन्य भत्ते देण्यासाठी खर्च होणार आहेत. प्रचालन व परिरक्षणाचा खर्चही १४ टक्के असून, प्रशासकीय खर्चही चार टक्के आहे. त्यामुळे विकासकामांसाठी उत्पन्नातील जेमतेम अडीच हजार कोटी रुपये शिल्लक राहणार आहेत. तरीही मुंबई महानगरपालिकेने मुदत ठेवी डोळ्यासमोर ठेवून कोणताही मागचा पुढचा विचार न करता विकासकामांसाठी ४३,१६२ कोटींची आर्थिक तरतूद केली. त्यामुळे यावर्षी तब्बल २९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त मुदत ठेवी मोडण्यात येणार आहेत.

यांचं काय जातंय हे मुंबईचे आहेत कुठे?

एकीकडे पालिकेच्या तिजोरीत पैसे नाहीत, तर दुसरीकडे मुदत ठेवी रिकामी होत आहेत. अशा परिस्थितीतही करोडो रुपये खर्च येणाऱ्या वर्सोवा-दहिसर कोस्टल रोडसारखा सुमारे ३५ हजार कोटी रुपयाच्या मोठ्या प्रकल्पाचे ओझे उचलले आहे. इतकंच नव्हे, तर मेट्रोसारख्या प्रकल्पालाही सुमारे पाच कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. पालिकेकडे असलेल्या मुदत ठेवी बघून सरकारने मोठे प्रकल्प महापालिकेच्या माथी मारण्यास सुरुवात केली. पण हे प्रकल्प आपल्या माथी मारून घ्यायचे की नाही हे महापालिकेच्या हातात आहे. पण राज्य सरकारसमोर तोंड बंद करत, पालिकेला कर्जबाजारी करण्याचा सनदी अधिकाऱ्यांचा डाव आहे किंवा तसे आदेशच सत्ताधाऱ्यांनी त्यांना दिले असावेत. तसेही आता ज्यांच्या हातात देशाचा आणि राज्याचा कारभार आहे ते मुंबईशी आपले नाते जमवू शकले नाहीत. १०६ हुतात्म्यांनी बलिदान करून, रक्त सांडवून ही मुंबई मिळवली आहे. त्यांच्याशी ज्यांची नाळ जुळली आहे त्यांनाच मुंबईची खरी किंमत माहीत आहे. आज केवळ मुंबईकडे एक कमर्शियल हब म्हणून पाहिले जाते. तसेही देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री गुजरातचे आहेत. गुजरातच्या मनात मुंबईकरांबद्दल एक आकस आजही आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आपल्या महाराष्ट्राने मुंबई गुजरातकडून हिसकावून घेतली होती. हा तो आकस आहे. त्यामुळे असेल कदाचित मुंबईकडे व्यापार एवढ्याच नजरेने गुजरातने पाहिले आहे. त्यात आता राज्याच्या सत्तेत असलेले एक विदर्भातले आणि उरलेले पश्चिम महाराष्ट्रातले त्यामुळे मुंबईकर म्हणून मुंबईवर असलेली आस्था त्यांच्या रगारगात नाही. हे मुंबईकडे आर्थिक स्रोत म्हणूनच बघत आहेत. मुंबई महानगरपालिका यांच्या हातात असली की, हे असेच त्याचे आर्थिक लचके तोडत राहणार. मुंबई महानगरपालिकेची आजची अवस्था स्वार्थी राजकीय लोकांनी आपल्या मालकीचे पैशाचे मशीन अशी केली आहे. आपली मुंबईकरांची महानगरपालिका आता कर्जबाजारी होण्याच्या उंबरठ्यावर आहे, याचे वाईट वाटतं. ज्यांना कर्जाचे गांभीर्य आणि ते फेडताना होणारी ससेहोलपट, व्याजापोटी नाहक जाणारे घामाचे पैसे याचे मूल्य माहीत असेल, त्यांनाच याचे

चटपटीत मसाला पाव

साहित्य- अमूल बटर अर्धी वाटी, दोन मध्यम कांदे बारीक चिरून, दोन मध्यम टोमॅटो बारीक चिरून, दोन टेबलस्पून बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट, पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन चमचे पाव भाजीचा मसाला, पावभाजीचे पाव, एक चमचा लाल मिरचीचे तिखट, एक चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ.

कृती- तव्यावर अमूल बटर घालून गरम करून घ्या व त्यात बारीक चिरलेला कांदा घालून तो मऊ होईपर्यंत परता. मग त्यात आलं-लसणाची पेस्ट घालून दोन मिनिटे परतून घ्या. नंतर पाव भाजीचा मसाला घालून पुन्हा दोन मिनिटे परता. आता त्यात बारीक चिरलेले टोमॅटो व लाल मिरचीचे तिखट घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत परता. मग हिरव्या मिरच्यांचे बारीक चिरलेले तुकडे घालून ते कुरकुरीत होईपर्यंत परता आता पावाच्या दोन्ही बाजूला (बाहेरून आणि आतून) बटर लावून दोन्ही बाजू भाजून घ्या.

नंतर आतील बाजूला आपण तयार केलेला मसाला सगळीकडे पसरून लावा. मसाला लावलेला पाव तव्यावर ठेवून डावाने सारखा दाबत राहून हलका भाजून घ्या. याच पद्धतीने सगळे पाव मसाल्याचे तयार करून घ्या. गरम मसाला पाव पुदिन्याच्या चटणी सोबत सर्व्ह करा.

चेहरा आरोग्याचा आरसा

आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. त्यातल्या त्यात चेहऱ्याची त्वचा आपले आरोग्य कसे आहे हे दर्शवीत असते. जुन्या काळातील आयुर्वेदासारख्या सगळ्या जुन्या उपचार पध्दतींनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. चीनमध्ये लोकप्रिय असलेल्या ऍक्युपंक्चर किंवा ऍक्युप्रेशर अशा जुन्या उपचार पध्दतीत सुध्दा चेहरा बघून आरोग्याचे निदान केले जाते.

आयुर्वेदामध्ये जशी नाडी परीक्षा आहे. तेवढी ही चेहऱ्याची परीक्षा शास्त्रशुध्द आणि नेमकी नाही. परंतु आरोग्याच्या काही तक्रारींचा अंदाज चेहऱ्याच्या त्वचेवरून येतो असे अनेक अनुभवी डॉक्टर आणि वैद्यांचे म्हणणे आहे. आपल्या शरीरातल्या अवयवांमध्ये जे काही घडते त्याची प्रतिक्रिया चेहऱ्यावर उमटते आणि चेहऱ्यावरून जे दिसते त्याचाच विस्तार शरीरातल्या अवयवांमध्ये झालेला असतो असे चिनी लोक मानतात.

आधुनिक काळातले त्वचारोग तज्ञ देखील त्वचेवरच्या विविध डागांवरून रुग्णाच्या कोणत्या अवयवात काय बदल झालेले आहेत हे हेरता येते असे मान्य करत आहेत. काही डॉक्टरांनी तर चेहऱ्यावरचा कोणता बदल शरीरातल्या कोणत्या दोषाचा द्योतक आहे याचे काही ठोकताळे बसवलेले आहेत. तोंडामध्ये होणारे बदल किंवा दिसणारे दोष हे पोटातल्या विकाराचे द्योतक असतात. अपचन झालेल्या रुग्णाच्या तोंडाला दुर्गंध येतो. पोटातल्या काही विकारांचे प्रतिबिंब तोंड येण्यात उमटत असते. मूत्रपिंड आणि मूत्राशय यात काही दोष असतील तर ते दोष हनुवटीवर उमटतात. त्याच बरोबर लिव्हरमध्ये काही दोष असेल तर पापण्यामध्ये बदल होतात. काही लोकांना या गोष्टी मान्य नाहीत परंतु शेवटी हे ठोकताळे आहेत.

काही लोकांच्या चेहऱ्यावर मानेच्या मागे त्वचा ड्रिकट पडायला लागते तेव्हा काही विशिष्ट आजार बळावत असतात. काही लोकांच्या चेहऱ्यावरच्या काही बदलांतून अनेक डॉक्टरांना तो मधुमेहाला बळी पडण्याची शक्यता लक्षात येते. चेहऱ्यातले काही बदल विशेषतः कानाच्या मागचे बदल हे रुग्ण ज्यादा अन्न प्राशन करत असल्याचे द्योतक असते असे काही डॉक्टरांच्या लक्षात आले आहे.

सतत पैशाच्या मागे लागणारे लोक, दारू पिणारे लोक, रक्तदाब वाढलेले लोक चेहऱ्यावरून सरळ सरळ ओळखू येतात मात्र त्यासाठी अनुभवी नजर लागते.

पपई खाण्याचे १० आरोग्यदायी फायदे!

चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई ! पपई शरीराला गरम असल्याने वातावरणात गारवा असताना खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाण्याचे आणखी दहा फायदेदेखील आहेत....

▮ शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करते- पपईमध्ये व्हिटामिन सी व फायबरचे प्रमाण अधिक असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहिल्याने हृद्यविकाराचा धोका संभवतो.

▮ वजन घटवण्यास मदत होते- एका मध्यम आकाराच्या पपईमध्ये 120 कॅलेरीज असतात. त्यामुळे जर तुम्ही वजन घटवण्याच्या विचारात असाल तर पपईचा आहारात नियमित समावेश करा. पपईतील डायटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

▮ रोगप्रतिकारशक्ती वाढते- आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते.

▮ मधुमेहींसाठी गुणकारी- पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ 8.3 ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

▮ डोळ्यांचे आरोग्य सुधारते- पपईमध्ये व्हिटमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा.

▮ सांधेदुखीपासून आराम मिळतो- पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

▮ पचन सुधारते- आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

▮ मासिक पाळीचा त्रास कमी होतो- अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास अशा समस्या दूर करण्यासाठी पपई फारच उपयुक्त आहे.

▮ कर्करोगापासून बचाव होतो- पपईमधील ऍन्टीऑक्सिडंट घटक शरीरातील फ्री रॅडीकल्सपासून तुमचा बचाव करते. तसेच पपईतील बीटा कॅरोटीन आतड्यांच्या कर्करोगापासून बचाव करते.

▮ ताण-तणाव कमी होतो - दिवसभराच्या धावपळीनंतर वाटीभर पपईचे काप खाल्ल्यास थकवा कमी होण्यास मदत होते. तसेच व्हिटामिन सी शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राखते.

आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सऍप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

व्हॉट्सऍप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सऍप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.

व्हॉट्सऍप ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सऍप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सऍप ने विंडोजसाठी एक नवीन ऍप आणला आहे. हा ऍप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सऍप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

मैक ओएस ला ही सुविधा मिळणार

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टेंट मेसेजिंग ऍप व्हॉट्सऍपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सऍप ऍप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ऍप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप कॉल कसा कराल?

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सऍप ऍपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.

पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक

हेल्दी राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

▮ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

▮ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

त्वचेसाठी लाभदायक तूप

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

दातांच्या समस्येने देखील कर्करोग होण्याची शक्यता

कर्करोग (कॅन्सर) होण्याचे नवे कारण सध्या समोर आले आहे. देशातील कित्येक लोकांना दात साफ न केल्यामुळे तोंडाचा कर्करोग (कॅन्सर) झाल्याचे समोर आले आहे. अशी दिरंगाई करणाऱ्या लोकांच्या संख्येत ४ ते ५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. जे लोक कोणत्याही प्रकारच्या तंबाखूचे सेवन करत नाहीत, त्यांना सुद्धा कर्करोग (कॅन्सर) होण्याची शक्यता आहे. तुटलेल्या दातांच्या फटी योग्यरीत्या साफ न केल्यामुळे हा गंभीर त्रास उद्भवण्याची शक्यता आहे. अन्नाचे कण दातांमध्ये अडकतात आणि त्यानंतर ते कण कुजतात. कुजलेल्या कणांमुळे सुद्धा कर्करोग होऊ शकतो. मागील सहा वर्षांमध्ये भारतात ओठ आणि तोंडाचा कर्करोग असणाऱ्या रुग्णांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आहे. या परिस्थितीला रोखण्यासाठी खराब दातांची स्वच्छता, तुटलेले दात याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे.

काही उपाय

- तंबाखू खाणे टाळा. जर तंबाखू खात असाल तर वेळीच खाणे बंद करा.
- मद्याचे सेवन प्रमाणात करा.
- उन्हामध्ये फार काळ राहणे टाळा. उन्हात जाण्याआधी लिपबामचा वापर करा.
- फास्ट फूड खाणे टाळा किंवा प्रमाणात खा. आहात ताज्या फळांचा वापर करा.
- सतत तंबाखूची तल्लफ येत असल्यास, पायऱ्यांवरून चढ-उतार करा.

वर्किंग वुमन्सने आहारात 'या' पोषक वस्तूंचा समावेश केला पाहिजे

स्त्रियांनी आपल्या आहाराची विशेष काळजी घेयला हवी कारण की त्यांना ऑफिस आणि घरात दोन्हीकडे लक्ष द्यावं लागतं. स्त्रिया सर्वांच लक्ष ठेवण्याच्या नादात स्वतःची काळजी घेत नाही. म्हणून वर्किंग वूमन्सला आपल्या आहारात पोषक वस्तूंचा समावेश केला पाहिजे. येथे प्रस्तुत आहे वर्किंग वूमन्ससाठी डायट चार्टः

ब्रेकफास्ट : वर्किंग वुमन्सने ब्रेकफास्ट स्किप करायला नको. घरातून निघण्याआधी आपण दूध, सांजा, कॉर्नफ्लेक्स किंवा सँडविच घ्या. सकाळच्या नाश्त्यात व्हिटॅमिन ए युक्त फळे जशी शेवफळ, पपई आणि स्ट्रॉबेरी खाणे फायदेशीर ठरेल. याबरोबरच थोडेसे ड्रायफ्रुट्स आपल्याजवळ ठेवावे.

लंच : वर्किंग वुमन्सच्या ब्रेकफास्ट आणि लंच यात चार ते पाच तासांचा अंतर हवे. लंचमध्ये भाजी, डाळ, दही, भात आणि पोळीचा समावेश करा. हिरव्या भाज्या जसे ब्रोकोली, पालक, मेथी व इतर आहारात सामील करा. लंचमध्ये सॅलड किंवा कोशिंबीर घ्या.

स्नॅक्स : ऑफिसमध्ये काम करणारे काही लोक संध्याकाळी भूक लागल्यावर काही अनहेल्थी फूड खातात, जे आरोग्याच्या दृष्टीने योग्य नाही. संध्याकाळी भूक लागल्यावर फळे किंवा कडधान्य खाणे फायद्याचे ठरेल. याने भूकही भागेल आणि आरोग्यासाठी उत्तमही ठरेल.

डिनर : रात्रीचे जेवण झोपण्याच्या दोन ते तीन तासांपूर्वी घ्यायला हवे. याने अन्न पचायला वेळ मिळतो. रात्री जेवल्याशिवाय झोपू नये. डिनरमध्ये तेलकट पदार्थ खाऊ नयेत. डिनरमध्ये पोळी आणि कमी मसालेदार भाजी किंवा डाळ हवी. डिनरमध्ये घेतला जाणारा आहार लंचपेक्षा लाइट असायला हवा.

शायनी केसांसाठी

एक चमचा ॲप्पल साइडर व्हिनेगरमध्ये १० थेंब आवळ्याचे तेल मिसळा आणि यात एक चमचा मध आणि एक चमचा पाणी मिसळा. आता या मिश्रणाने शाम्पूनंतर पाच मिनिटापर्यंत आपल्या डोक्याचा मालीश करा आणि मग गार पाण्याने केस धुऊन घ्या.

हल्लीच्या जीवनशैलीत प्रत्येक जण लठ्ठपणामुळे त्रस्त आहे. वजन कमी करण्यासाठी कधी डायटिंग तर कधी व्यायाम तर कधी काय...तरी यश हाती लागत नसेल तर सर्वात मोठे कारण आहे की आपल्या डेली डायटमध्ये सामील अशा चार वस्तू ज्यामुळे आपल्या प्रयत्नांना यश मिळत नाहीये. जर या वस्तूंचे सेवन करताना आपण काळजी घेतली नाही तर परिणाम वाईट होऊ शकतात.

लठ्ठपणा कमी करण्यासाठी या चार पदार्थांपासून जरा लांबच राहा!

मीठ : आपण मिठाचे अधिक सेवन करत असाल तर हे आपल्या आरोग्यासाठी धोकादायक ठरेल. एका शोधाप्रमाणे एका दिवसात एक ग्रॅमहून अधिक मीठ सेवन केल्यास लठ्ठपणा वाढू शकतो. संतुलित प्रमाणापेक्षा अधिक मीठ खाणाऱ्यांचे वजन इतर लोकांपेक्षा अधिक असतं. तसेच पॅक्ड पदार्थांमध्ये मिठाचे प्रमाण अधिकच असतं.

साखर : गोड प्रत्येकाला आवडतं, परंतु अधिक प्रमाणात साखर नुकसान करते. कारण साखरेमुळे लठ्ठपणा जलद गतीने वाढतो आणि नंतर यावर नियंत्रण ठेवणं कठीण जातं. आपण दररोजच्या आहारात साखरेचे प्रमाण कमी करून वजन कमी करू शकता. चांगल्या आरोग्यासाठी पुरुषांनी दररोज ५० ग्रॅम आणि महिलांनी ७० ग्रॅमहून अधिक साखरेचे सेवन करू नये.

तांदूळ : आपण तांदूळ खाण्याचे शौकीन असाल तर लठ्ठपणा कमी करणे जरा अवघड आहे. पांढऱ्या तांदळात कार्बोहायड्रेटचे प्रमाण अधिक असल्यामुळे लठ्ठपणा वाढतो. वजन कमी करण्याची इच्छा असल्यास पांढऱ्याऐवजी ब्राऊन राईसचे सेवन करावे.

मैदा : मैदा आणि मैद्याचे खाद्यपदार्थ सेवन केल्याने लठ्ठपणा कधीच कमी होणार नाही. कारण मैद्यामुळे शरीरात ब्लड शुगर वेगाने वाढते, ज्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि कर्करोग यासारखे आजार होण्याची शक्यता वाढते.

पाणी पिणाऱ्याची बुद्धी पाणीदार

पाणी प्यायल्यामुळे बुद्धी तेज होते आणि कोणत्याही माहितीचे आकलन पटकन होते, असे इंग्लंडमध्ये करण्यात आलेल्या एका प्रयोगात आढळले आहे. ईस्ट लंडन स्कूल ऑफ सायकॉलॉजी या संस्थेमध्ये पाणी आणि आकलन शक्ती यांच्या संबंधावर काही प्रयोग करण्यात आले, तेव्हा असे आढळले की माणूस पाणी पिऊन एखादे वाचन करतो तेव्हा त्याला वाचलेल्या मजकुराचे आकलन चांगले होते. याउलट एखाद्या व्यक्तीला भरपूर तहान लागलेली असताना सुद्धा प्यायला पाणी न देता वाचन करायला लावले तर किंवा एखादे काम करायला लावले तर ती व्यक्ती पाणी प्यायलेल्या व्यक्तीपेक्षा मंदपणे आकलन करते. या दृष्टीने या संस्थेने या लोकांवर प्रयोग केले आणि तहानलेल्या अवस्थेत त्यांना काही अवघड कामे सांगितली. तेव्हा त्यांना ती कामे व्यवस्थित समजली नाहीत. उलट भरपूर पाणी प्यायलेल्या लोकांना हीच कामे सांगितली तेव्हा त्यांना ती १४ टक्के जास्त वेगाने समजली.

यामागचे कारणे काय असावे, याचा छडा लावण्यात आला. तेव्हा असे आढळले की कोणत्याही गोष्टीचे आकलन होण्यासाठी आपल्या शरीरातील व्हॅसोप्रेसिन हे हार्मोन कार्यरत व्हावे लागते. कमी पाणी प्यायलेल्या अवस्थेत हे हार्मोन कार्यरत होत नाहीत आणि भरपूर पाणी प्यायल्यास ते कार्यरत होते.

रिकाम्या पोटी 'हे' पदार्थ खाणे टाळाच!

सकाळी उठल्या उठल्या काय खावे हा प्रश्न अनेकांना पडतो. भारतीयांमध्ये तर उठल्याबरोबर चहा घेणे ही जणू रीतच आहे. मात्र नुसता चहा घेणे आरोग्यासाठी घातक असल्याचे मागील काही काळापासून बोलले जात असल्याने त्यासोबत बिस्किटे, खारी, टोस्ट खाण्याचे प्रमाण वाढले. मात्र चहा-कॉफी दिवसाची सुरुवात करताना घेऊच नये, असे अनेक आहारतज्ज्ञ सांगताना दिसतात. त्यामागे काही महत्त्वपूर्ण कारणे नक्कीच आहेत. काही गोष्टी रिकाम्या पोटी खाल्ल्यास आरोग्याला दीर्घकालीन अपाय होऊ शकतात. त्यामुळे रिकाम्या पोटी कोणत्या गोष्टी खाणे किंवा पिणे टाळावे हे जाणून घेऊया...

चहा-कॉफी

सकाळी उठल्या उठल्या चहा किंवा कॉफी घेण्याची सवय अनेकांना असते. हे योग्य नाही, हे माहीत असूनही केवळ लहानपणापासूनची सवय म्हणून किंवा कुटुंबातून चालत आलेली परंपरा म्हणून ते चालूच ठेवतात. मात्र आरोग्यासाठी हे अजिबात चांगले नसून चहामुळे पोटातील ॲसिड वाढते. त्यामुळे अल्सर किंवा छातीतील जळजळ वाढते.

याप्रमाणेच उठल्यावर कॉफी प्यायल्याने फ्रेश वाटते असे अनेकांचे म्हणणे असते. मात्र शरीरातील हॉर्मोन्सचे संतुलन बिघडण्यास कॉफी कारणीभूत ठरते. एकदा हॉर्मोन्सचे संतुलन बिघडले की ते पूर्वपदावर येण्यास बराच वेळ लागतो.

औषधे

झोपेतून उठल्यावर लगेच औषधे घेऊ नयेत, असा सल्ला डॉक्टरही आपल्या रुग्णांना अनेकदा देतात. अँटीबायोटिक्समधील घटक आतड्यांना त्रासदायक ठरू शकतात. यामुळे आतड्यांच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. या औषधांमुळेही अल्सर होण्याची शक्यता असते.

म्हणून उठल्यावर औषधे घेऊ नयेत.

मसालेदार पदार्थ

सकाळच्या नाश्त्याला तिखट किंवा मसालेदार पदार्थ खाऊ नयेत. मसाले किंवा मिरच्यांमुळे पोटात ॲसिडची निर्मिती होते. यामुळेही अल्सर होऊ शकतो. तिखट पदार्थ सकाळी सकाळी खाल्ल्यामुळे शौचासही त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे शक्यतो तेलकट आणि तिखट पदार्थ नाश्त्याला टाळावेत.

बीयर आणि शीतपेये

सकाळी उठल्यावर शक्यतो कोणी शीतपेये आणि बीयर पीत नाही. मात्र सकाळपासून पोट रिकामे असले आणि एकदम जेवणादरम्यान शीतपेय किंवा बीयर घेतल्यास ते आरोग्यासाठी अतिशय हानीकारक ठरु शकते. रिकाम्या पोटी बीयर घेतल्यास जास्त नशा चढते आणि ते आरोग्यासाठीही हानीकारक असते. शीतपेयांमुळे मळमळणे, ॲसिडिटी अशा समस्या उद्भवू शकतात.

खडवलीत 'बाल आश्रम'च्या नावाखाली नराधमांची क्रूरता
उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी घेतली पीडित मुलामुलींची भेट

■**उल्हासनगर :** खडवलीतील एका तथाकथित बाल आश्रमात २९ निरागस बालकांवर शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषण होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. या घटनेने अवघा महाराष्ट्र हादरला असून, समाजाच्या विश्वासाला तडा देणाऱ्या नराधमांविरोधात पोलिसांनी पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. या घटनेतील पीडित मुलामुलींना उल्हासनगरच्या शासकीय ठिकाणी ठेवण्यात आले आहे. बुधवारी विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी त्या पीडित मुलामुलींची भेट घेत थेट ठाणे पोलीस अधीक्षकांशी चर्चा करून कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत.

बालकांच्या सुरक्षेच्या नावाखाली सुरू असलेल्या तथाकथित 'बाल आश्रम'चे खरे स्वरूप समोर आले असून, या संस्थेत २९ बालकांवर अत्यंत अमानुष पद्धतीने अत्याचार होत असल्याचे उघड झाले आहे. खडवली परिसरात सुरू असलेल्या या अनधिकृत आश्रमात राहणाऱ्या निरागस बालकांवर मानसिक, शारीरिक आणि लैंगिक शोषण होत होते. या प्रकरणी टिटवाळा पोलिसांनी बबन शिंदे, त्याची पत्नी आशा शिंदे, मुलगा प्रसन्न शिंदे, शिक्षिका दर्शना पंडित आणि कर्मचारी प्रकाश गुप्ता यांना

अटक केली आहे. या सर्वांवर पोस्को कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही घटना समोर येण्यामागे एका जागरूक नागरिकाचा '१०९८ चाईल्ड हेल्पलाइन'वर दिलेला फोन महत्त्वाचा ठरला. त्यानंतर बाल संरक्षण विभाग आणि टिटवाळा पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आश्रमात धाड टाकली आणि २९ बालकांची सुटका केली. चौकशीत दोन बालिकांवर लैंगिक अत्याचार झाल्याचे समोर आले, तर अन्य मुलांना मारहाण आणि मानसिक छळ सहन करावा लागत असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेनंतर पीडित मुलामुलींना उल्हासनगरच्या शासकीय ठिकाणी ठेवण्यात आले होते.

या घटनेची माहिती मिळताच विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी उल्हासनगरात पीडित मुलामुलींची भेट घेतली. त्यांनी ठाणे जिल्हा पोलीस अधीक्षक स्वामी यांच्याशी संवाद साधून नराधमांविरोधात कठोरात कठोर कारवाईचे निर्देश दिले.

खडवलीतील हा प्रकार अमानवी प्रवृत्तींचा चेहरा उघड करणारा आहे. 'बाल संरक्षण' या संकल्पनेवरचा विश्वास हादरवणाऱ्या अशा घटकांना कडक शासन होणे आवश्यक आहे. पोलिसांनी तातडीने केलेल्या कारवाईमुळे आणखी काही बालकांचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचले. असे प्रकार पुन्हा होऊ नयेत यासाठी सर्वांनीच सजग राहणे गरजेचे आहे.

"राज्यात अशा प्रकारे बालकांच्या आयुष्याशी खेळ करणाऱ्यांना माफ करण्यात येणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या प्रकरणातील सर्व खटल्यांना फास्ट ट्रॅक कोर्टमध्ये नेण्याची मागणी करणार आहे."
- नीलम गोऱ्हे, विधान परिषद उपसभापती

मुरबाडमध्ये पाण्यासाठी वणवण

■**भाईंदर :** दरवर्षी मुरबाडच्या पाणीपुरवठ्यासाठी कोटी रुपयांचा निधी खर्च केला जातो. यासाठी मोठ्या प्रमाणात शासकीय योजना लागू केल्या जातात मात्र मुरबाडववरील पाणीटंचाईचे शुक्लकाष्ठ काही संपता संपेना असेच चित्र दरवर्षी पहावयास मिळत आहे. मुरबाड तालुक्यातील १८ गाव, ३६ वाड्या आणि पाडे पाणीटंचाईच्या समस्यांना सोमोरे जात आहेत. जसजसा उन्हाचा पारा वाढत आहे तसेच पाणीटंचाईची झळ

अधिक तीव्र होत असल्याची खंत मुरबाडकरांनी व्यक्त केली आहे. यंदा उन्हाचा पारा मार्च महिन्यापासूनच तळपू लागल्याने त्याची झळ एप्रिल महिन्यात अधिक जाणवू लागली आहे. अशा स्थितीत पाण्याची पातळी कमी होत असल्यामुळे स्थानिकांना पाण्यासाठी वणवण भटकंती करण्याची वेळ आली आहे. पावसाळ्यात धरणे भरली तरी उन्हाळ्यात धरणांची पातळी ४० टक्क्यावर येत असल्यामुळे पावसाचे पाणी जाते कुठे? असा प्रश्न स्थानिक विचारत आहेत. ग्रामीण भागातील पाण्याची तहान भागवण्यासाठी शासनाच्या वतीने टँकरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आदिवासी वाड्या-पाड्यात, गावागावात पाण्यासाठी महिलांना, मुलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. ज्यांच्या जमिनी पाण्यासाठी दिल्या त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे, अशी स्थिती ठाणे जिल्ह्यातील मुरबाड भागात अधिक दिसत आहे.

बफर झोनमध्ये इमारती बांधणाऱ्या बिल्डरवर गुन्हा दाखल

■**भाईंदर :** मिरा-भाईंदरमध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशाला केराची टोपली दाखवून कांदळवन जागेत मँग्रोव्ह झाडाची कत्तल करून त्यावर डेब्रिज मातीची भरणी टाकून बांधकाम करर्णाया बिल्डर आणि भूमाफियावर अपर तहसीलदारांच्या आदेशानुसार पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार मिरारोड पोलीस ठाण्यात आणि काशीगाव पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.मिरारोड पूर्वेच्या कनकिया परिसरात मौजे नवघर येथील सर्व्हे क्रं. ८४ हिस्सा क्रं. ४ मध्ये या जमिनीच्या आजूबाजूला कांदळवनाची झाडे आणि बफर झोन असतानाही तसेच मँग्रोव्हची झाडे अस्तित्वात असतानाही त्या ठिकाणी चुकीचा अहवाल बनवण्यात आला. त्यावरून बांधकाम करर्णाया बिल्डरवर पर्यावरणाचा ऱ्हास केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुर्सया गुन्ह्यात मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्रं. १ हिस्सा क्रं. १ ते ७, सर्व्हे क्रं. ३ हिस्सा क्रं. १ ते ७, सर्व्हे क्रं. ५ हिस्सा क्रं. १ ते ५, सर्व्हे क्रं. ५५ हिस्सा क्रं. १ ते ४, सर्व्हे क्रं. ७ हिस्सा क्रं. १ ते ७ व सर्व्हे क्रं. २३२ हिस्सा क्रं. १ व २ आणि सर्व्हे क्रं. ४३ हिस्सा क्रं. १ ते ६ याठिकाणी डेब्रिज व मातीची भरणी टाकून त्यावर कच्चा झोपड्या भंगाराचे गोडाऊन व झोपड्या बांधल्या असल्याने काशीगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मिरारोड पोलीस ठाण्यात तलाठी तुषार खेडकर यांच्या तक्रारीवरून वालचंद अव्हेन्यू इमारतीचे विकासक हरीश प्रकाश जैन यांच्या विरोधात पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या कलम १५, १९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मेघना बुरांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुनील साळुंखे हे करत आहेत.

तर दुसरा गुन्हा हा काशीगाव पोलीस ठाण्यात तलाठी ललित सातपुते यांच्या तक्रारीवरून पर्यावरण संरक्षण कायद्याखाली दाखल करण्यात आला आहे. त्याचा तपास महेश तोगरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बंडू केसरे हे करत आहेत.

चिरनेर आदिवासी वाड्यांवर तीव्र पाणीटंचाई... ग्रामपंचायतीकडून टँकरने पाणीपुरवठा

■**उरण :** चिरनेर ग्रा.पं. हद्दीतील चांदायली वाडी आणि केळ्याचा माळ या वाड्यांना तीव्र पाणीटंचाईची झळ बसू लागली आहे. चिरनेर ग्रामपंचायतीच्या वतीने या वाड्यांना टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरू असून जिल्हा परिषदेकडून या वाड्यांवर टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा,अशी मागणी ग्रामपंचायतीतर्फे करण्यात आली आहे. या आदिवासी वाड्यांमध्ये जवळ जवळ ४५ ते ५० आदिवासी कुटुंबाचे वास्तव्य आहे.

या वाड्यातील विहिरींनी जानेवारी

महिन्यातच तळ गाठला आहे. आणि तेव्हापासून या आदिवासींची पाण्यासाठी वणवण सुरू आहे. ग्रामपंचायतीने या वाड्यांवर तातडीची सोय म्हणून मार्च महिन्याच्या सुरुवातीपासून टँकरने पाणीपुरवठा सुरू केला आहे. मात्र या टँकरचा खर्च ग्रामपंचायतीला परवडत नसल्याने जिल्हा परिषदेतर्फे या वाड्यांना पाणीपुरवठा करावा अशा मागणीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेला पाठविण्यात आला आहे.

कामातील दिरंगाईचा स्थानिकांना फटका

"ग्रामपंचायतीतर्फे मार्च महिन्यांपासून या वाड्यांवर टँकरने पाणीपुरवठा सूरू आहे. आत्ता ग्रामपंचायतीने जिल्हा परिषदेकडे टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे,तसा प्रस्ताव बिडीओमार्फत पाठविण्यात आला आहे."
- महेशकुमार पवार, ग्रामविकास अधिकारी, चिरनेर

चिरनेर ग्रामपंचायतीत गावातील नळांना एकीकडे धो-धो पाणी सुरू असून दुसरीकडे नळांना पाण्याचा एक थेंबही नाही,अशी विषम परिस्थिती आहे.शासनाने या आदिवासी वाड्यांना पाणीपुरवठा सुरळीत व्हावा,यासाठी जल जीवन योजनेतून १ कोटी ९८ लाख रुपयांची योजना मंजूर केली आहे. दीड-दोन वर्षांपासून या योजनेचे काम सुरू देखील झाले आहे मात्र २५ टक्क्यापर्यंतचे काम पूर्ण झाले असल्यामुळे आदिवासी वाड्यांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

लग्नातून दागिने चोरी, पोलीस तपासात धक्कादायक माहिती उघड
वऱ्हाडीच तब्बल २१... खोदावी लागली जमीन

■**कोल्हापुर :** कोल्हापुरातल्या एका वऱ्हाड्यानंच लग्नातल्या दागिन्यांवर डल्ला मारला. यामुळं मंगल कार्यालयात एकच खळबळ उडाली. त्यानंतर पोलीस तपासात जी माहिती समोर आली त्यानं सर्वांनाच धक्का बसला.

कोल्हापुरातल्या एका लग्न समारंभात वेगळाच प्रकार घडला. या लग्नात एक अगंतूक पाहुणा वऱ्हाडी बनून आला. त्यानं दिमाखात फेटा बांधली. इतर वऱ्हाड्यांप्रमाणं लग्नात मिरवलं. नंतर त्याच लग्नातले दागिने घेऊन अलगद पसार झाला. यानंतर लग्नघराने पोलीस स्टेशनला तातडीनं तक्रार केली. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या मदतीनं बाळासो उर्फ अजित प्रकाश पाटील या सराईत चोरट्याला बेड्या ठोकल्या आहेत. तो मूळचा आदमापूरचा आहे. त्याच्याकडून पोलिसांनी ४ लाखांचे दागिने हस्तगत केले आहेत. विशेष म्हणजे त्यानं अशा एकूण २१ गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

या वऱ्हाडी चोरानं फक्त कोल्हापूर जिल्ह्यातच नाही तर पुणे, सांगली, साताऱ्यातल्या अनेक लग्न समारंभातही दागिन्यांवर असाच डल्ला मारल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. हा वऱ्हाडी चोरटा लग्न समारंभात चोरलेले दागिने तातडीने

विकत नव्हता तर स्टीलच्या डब्यात भरून तो जमिनीत पुरून ठेवायचा. पोलिसी खाक्या दाखवल्यावर चोरटा अजित पाटीलनं स्वतःहूनच पोपटासारखी या मोडस ऑपरेंडीची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीनं शोध मोहीम राबवून खड्डयातून एक डबा खोदून बाहेर काढला ज्यात सोन्याचे दागिने ठेवले होते.

सध्या राज्यभर लग्नसराईचा माहोल आहे. अशात लग्नात शेकडो पाहुणे, वऱ्हाडी मंडळी येतात. मात्र त्यातला असा कुणी वऱ्हाडी चोरही निघू शकतो आणि लग्नातल्या दागिन्यांवर डल्ला मारू शकतो. त्यामुळं लग्न घरातल्या मंडळींनी अशा अगंतूक वऱ्हाडींवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवणं गरजेचं आहे.

शहापूरात आठवणीतल्या बैलगाड्या पुन्हा पाण्यासाठी रस्त्यावर

■**शहापूर :** तालुक्यातील आदिवासी गाव-पाड्यावर पाणीटंचाईचा विळखा वाढत चाललेला असताना अतिदुर्गम गाव- पाड्यावरील ग्रामस्थांनी मात्र पाण्यासाठी चक्क जुना पर्याय अवलंबत मागील दहा-पंधरा वर्षांपासून अडगळीत गेलेले बैलगाडी पुन्हा पाण्यासाठी रस्त्यावर उतरल्याचे चित्र शहापूरमध्ये दिसू लागले आहेत. शहापूर तालुक्यातील तानसा, मोडक सागर धरणातून मुंबई, ठाण्यासारख्या शहरांना नियमित पाणीपुरवठा करणाऱ्या शहापूर तालुक्यालाच पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. तालुक्यातील ५० टक्के गावांमधून शहरातील पाणीपुरवठ्याच्या जलवाहिन्या जात आहेत. तर भातसा धरणातून मुंबईला जाणारे पाणी हे भातसा नदीद्वारे मुंबईला जाते,त्या नदीच्या काठावर असलेल्या ३० टक्के तालुक्यात गावे वसलेली आहेत. विशेष म्हणजे भातसा नदी किनारी असलेल्या गावांना पाणीटंचाई भेडसवण्याचे प्रमाण अत्यल्प आहे मात्र तालुक्यातील ७० टक्के गावांना या धरणांचा काडीमात्र उपयोग होत नसल्याने या गावांमध्ये डिसेंबर - जानेवारीपासूनच पाणीटंचाईला तोंड देण्यास सुरुवात होते. शहापूर तालुक्यातील २७ गावे व १०२ पाडे यांना ३७ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात असून उन्हाची दाहकता पाहता यात एप्रिल अखेरपर्यंत आणखी गाव - पाड्यांना पाणीटंचाईची झळ बसू शकते. पेट्रोल, डिझेलचे वाढलेले दर व त्यासाठी असलेले वाहनांचे भाडे यांचा कुठेच आर्थिक ताळमेळ बसत नसल्याने ग्रामीण भागातील जनतेने आपले दहा -पंधरा वर्षांपासून बंद असलेल्या बैलगाड्यांना पुन्हा रस्त्यावर उतरविले आहे. ग्रामीण भागात आदिवासी पाड्यावर या बैलगाड्यांच्या माध्यमातून २०० लिटर पाण्याची वाहतूक सहजरित्या केली जात आहे.

'माननीय चोरसाहेब, जीवावर उदार होऊन आपण...'
सततच्या चोरीला वैतागले वकिलाने थेट चोराला लिहिलं पत्र

■**जालना :** आता बातमी आहे एका आगळ्यावेगळ्या पत्राची. सततच्या चोरीला कंटाळलेल्या जालन्यातल्या एका वकिलांनी घराबाहेर चोरांसाठी एक पत्रच लिहिलं आहे. सध्या ते जिल्ह्यात चचेर्चा विषय ठरलाय. नेमका का विषय आहे तरी काय, जाणून घ्या.

जालन्यातील वकील ललित हट्टेकर, त्यांचं एसटी कॉलनीत वडिलोपार्जित घर आहे. याच घरात ५ महिन्यांपूर्वी अज्ञात चोरट्यांनी हात साफ केला. वकीलाच्या घरातून चोरांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह एकूण १० लाखांचा मुद्देमाल लंपास केला. वकील हट्टेकरांनी पोलीस तक्रार केली. पण चोर काही पोलिसांच्या हाती लागले नाहीत. मात्र मागच्या काही महिन्यात वकील हट्टेकर यांच्या घरी पुन्हा २ वेळा चोरी झाली. यावेळी चोरट्यांच्या हाती काहीच लागलं नाही. मात्र वकील ललित हट्टेकरांचं कुटुंब सततच्या चोऱ्यांमुळे घाबरलं. अखेर हतबल जालेल्या हट्टेकर यांनी घराच्या भिंतीवर या अज्ञात चोरांसाठी एक पत्रच लिहून टाकलं आहे.

वैतागलेल्या वकिलाचं चोराला पत्र

''माननीय चोरसाहेब, सस्नेह नमस्कार, जोखीम त्याचप्रमाणे तंत्रज्ञान, समन्वय आणि जीवावर उदार होऊन आपण करीत असलेल्या कलेला वंदन. आपली ओळख नाही. परंतु ३ चोऱ्यांच्या वेळी आपल्या वाट्याला निराशा आली असेल. एक वेळेस मात्र, आपण माज्या आयुष्यभराची कमाई घेऊन गेलात. मी पत्नी आणि मुलासह घरात राहतो. घरात सोने-चांदी,पैसे नाहीत. भांडीकुंडी, वॉशिंग मशीन आणि इतर सामान आहे. त्यामुळे घरफोडी करून माझा



आणि तुमचा वेळ वाया घालवू नका. कडीकोयंडे तोडल्यामुळे माझे नुकसान होते.चोरीसाठी तुम्हाला ही जागा आदर्श वाटत असेल. मोठी रक्कम दिल्यावर हे घर तुम्हाला विकू शकतो. मग तुम्ही तेथे अवैध धंदे करू शकालर्र वकील ललित हट्टेकर यांनी भिंतीवरील पत्रात हा सगळा मजकूर लिहिलाय. वर आपल्याकडे शस्त्र परवाना असल्याची जाणीवही चोरट्यांना करून दिलीय.''

वकील ललित हट्टेकर यांनी हे पत्र लिहून दिड महिना झाला आहे. दीड महिन्यात त्यांच्या घराकडे चोरटे फिरकलेही नाहीत.त्यामुळे हे पत्र लिहून फायदाच झाला असा दावा हट्टेकर यांनी केला आहे.

जालन्यात शहरी भागासह ग्रामीण भागात चोरट्यांचा धुमाकूळ सुरु आहे. चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा करण्यात पोलिसांनाही अपयश येत आहे. महिनाभरात जिल्ह्यात शेकडो चोऱ्या होत आहेत. अशा चोरटयांना वकील हट्टेकरांनी पत्र लिहून त्यांच्या पद्धतीने धडा शिकवला आगे. मात्र आता ही बातमी बघून पत्र वाचायला पुन्हा चोर हट्टेकरांच्या घराला भेट द्यायला नको म्हणजे झालं.

रस्त्यात खेळणाऱ्या मुलांना बाजूला करण्यासाठी हॉर्न वाजवला
संतापलेल्या गँगने पिता-पुत्राला... कुर्ल्यातील घटना

■**मुंबई :** हॉर्न वाजवल्यामुळे संतप्त झालेल्यांचा पिता-पुत्रावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना मुंबईतील कुर्ल्यात घडली आहे. खेळणाऱ्या मुलांना बाजूला करण्यासाठी हॉर्न वाजवल्यामुळे संतप्त झालेल्या चौघांनी १७ वर्षीय मुलासह त्याच्या वडिलांवर जीवघेणा हल्ला केल्याच्या घटनेमुळं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. बुधवारी कुर्ल्यात ही घटना घडली आहे. याप्रकरणी कुर्ला पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

कुर्ला परिसरात राहणारा १७ वर्षीय मुलगा आणि त्याचे वडील या हल्ल्यात गंभीर जखमी झाले. मुलाच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. खेळणाऱ्या मुलांना बाजूला करण्यासाठी हॉर्न वाजवल्यामुळे संतप्त झालेल्या चौघांनी १७ वर्षीय मुलासह त्याच्या वडिलांवर जीवघेणा हल्ला केला असल्याची तक्रार मुलाने केली आहे.

कुर्ला परिसरात राहणारा १७ वर्षीय मुलगा आणि त्याचे वडील या हल्ल्यात गंभीर जखमी झाले. मुलाच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. मुलाच्या वडिलांचे चिंधी गल्लीत कपड्यांचे दुकान आहे. त्यांना मदत करण्यासाठी मुलगा नेहमीप्रमाणे बुधवारी दुकानात गेला. बुधवारी दुपारी पावणे ३ च्या सुमारास वडिलांनी जेवायला जाण्यासाठी दुचाकी बाहेर काढण्यास सांगितली. वडील कामात व्यस्त असल्याने त्यांचा मुलगा दुचाकीकडे गेला. तेथे काही लहान मुले खेळत असल्याने त्याने त्यांना हॉर्न वाजवून बाजूला होण्यास सांगितले. हॉर्न वाजवल्यामुळे संतप्त झालेल्या मुलांनी त्याला शिवीगाळ केली आणि वाद घालण्यास सुरुवात केली. त्यामुळे घाबरलेला मुलगा दुकानात पळाला.

त्यानंतर काही वेळात चार अनोळखी तरुण दुकानाच्या दिशेने धावत आले. त्यांनी शिवीगाळ करीत मुलाला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. या मुलांनी लोखंडी सळीने तरुणावर हल्ला केला. मुलाच्या मदतीला धावलेल्या वडिलांच्या डोक्यावर लोखंडी सळीने प्रहार करण्यात आला, तसेच त्यांच्यावर चाकूने वार करण्यात आले. या हल्ल्यात पिता-पुत्र गंभीर जखमी झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवत आरोपींचा शोध सुरू केला आहे.

राज्यात मुंबईतील शीना बोरा अन् पेणमधील घटनेनंतर पुन्हा महिलेचा सुटकेसमध्ये मृतदेह

■**पनवेल :** राज्यात पुन्हा मुंबईतील शीना बोरा हत्येची आठवण झाली आहे. शीना बोरा हत्या, पेणमध्ये सुटकेसमध्ये सापडलेला मृतदेह या घटना अजूनही विस्मृतीत गेल्या नाही. त्याचवेळी रायगड जिल्ह्यात पुन्हा एका सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह सापडला आहे. कर्जतच्या रेल्वे ट्रॅकवर महिलेचा मृतदेह गुलाबी रंगाच्या सुटकेसमध्ये सापडला आहे. शीना बोरा आणि पेणपाठोपाठ रायगड जिल्ह्यात तिसरी ही थरारक घटना समोर आली आहे.

पनवेल पुणे रेल्वे मार्गावर कर्जत रेल्वे ट्रकवर एका गुलाबी सुटकेसमधून महिलेचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. हत्या करून मृतदेह बॅगमध्ये कोंबण्यात आला आहे. धावत्या ट्रेनमधून ही बॅग फेकण्यात आल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. सध्या पोलीस तांत्रिक तपासाच्या आधारे हत्येचा छडा लावण्याचा प्रयत्न करत आहेत. ही महिला कोण आहे? तिची हत्या कोणी अन् कशासाठी केली? या प्रश्नांची उत्तरे पोलिसांच्या तपासानंतर समोर येणार आहे.

धावत्या ट्रेनमधून मृतदेह फेकण्यात आल्याचा पोलिसांचा अंदाज आहे. त्यामुळे या स्टेशनवर कोणकोणत्या गाड्या थांबता त्याचा तपास पोलीस करत आहे. तसेच सीसीटीव्ही फुटेज तपासले जाणार आहे. त्यातून ही बॅग कोण घेऊन आले

त्याचा शोध घेतला जाणार आहे.

कर्जतच्या रेल्वे ट्रॅकवर सापडलेल्या या मृतदेहामुळे 'सुटकेस बॉडीज' ही भयानक संकल्पना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या आधी शीना बोरा हत्या प्रकरण, पेणमध्ये सुटकेसमधून सापडलेला मृतदेह हे प्रकार घडले होते. आता कर्जतमधील ही घटना आहे. या सलग तीन प्रकरणांनी रायगड जिल्ह्यात नेमके काय सुरू आहे, असा गंभीर सवाल निर्माण होत.

सन २०१२ मधील शीना बोरा हत्या प्रकरण देशभर गाजले होते. शीना बोराची हत्या इंद्राणी मुखर्जी, तिचा चालक श्यामवर आणि संजीव खन्ना यांनी गळा दाबून केली होती. त्यानंतर शीना बोराचा मृतदेह एका सुटकेसमध्ये भरुन रायगडच्या जंगलांमध्ये फेकला होता. रायगड जिल्ह्यात पेण तालुक्यातील दुरशेत फाटा येथे नदी किनारी एका सुटकेस मध्ये महिलेचा मृतदेह आढळून आला होता. यावर्षी मार्च महिन्यातच ही घटना घडली होती. दरम्यान, आता लोणावळा रेल्वे पोलिस यंत्रणा महिलेची ओळख पटविण्याचे काम करत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com